साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........८१ ८६
दुसरे खेपेस ..........८१

…in arrears 7 „ 1 …
Six monthly......... 3 .........„
Single copy ...................... 4.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 12 JULY 1897 NO 27
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १२ माहे जुलै सन १८९७ इ० अंक २७

### नोटीस

नोटीस देणार महमद हातम वल्द शेख-महेबुबखा राहणार अडगांव तालुके अकोट जिल्हे अकोलें याजकडून बनुबी मर्द महमद हातम रहाणार अकोट इजला नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमारें सात वर्षें झालीं. तुझे शिवाय आणखी एक माझी बायको ईच्या शीं तुझे आगोदर तिच्याशीं माझें लग्न झालें तिचें व तूझें आजपर्यंत चांगलें असून तूं देखील बरी वागली, परंतु हल्लीं ती वयांत आल्यामुळें जनरिवाजा प्रमाणें मला तिजबरोबर वागणें भाग आहे. आणि तुझें ह्मणणें तर तिचेशीं मुळींच संबंध न ठेवतां तिला घराबाहेरही काढून द्यावें असें आहे; तर असें करणें मला मुळींच उचीत नाहीं. तुला व तिला बरोबर वागविणें हें माझें काम आहे व तुला माझे ह्मणण्या प्रमाणें वागणें भाग आहे आतां तीन चार महिनें पासून ज्या प्रमाणें पूर्वी जात होती त्या प्रमाणें गेली नंतर तुला आणण्या करितां मी बरेच वेळां आलों परंतु तूं आली नाहींस व तुझा बाप व तुझी आई व तुझा मामा ह्यांचे ह्मणण्या प्रमाणें तूं माझेशी तंटा केला ह्मणून मी गांवाकडे निघुन गेलों व आकोट येथें बरेच माणसास माहिती आहे. आतां तूं माझे हुकूप्रमाणें वागत नाहीं करितां तुला कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पाहतांच आठ दिवसांचे आंत तूं आपले आप माझे घरीं येऊन दाखल व्हावें अगर मजला निरोप लेखी पाठवावा. ह्मणजे मी पुन्हा तुला नेण्यास येईल. जर तूं माझे ह्मणण्या प्रमाणें वागणार नाहींस तर हें करणें तुला योग्य नाहीं. जर तूं दुसेंर लोकांचे ह्मणणें ऐकूण कचेरींत गेली व तूं गोइयाची बायको असून तुला कळविलें आहे जर तुं कचेरींत जाऊन कोणच्या ही प्रकारचा मजवर दावा वगैरे केल्यास व माझी बेअबरू केल्यास मी तुला वागविणार नाहीं व कोणते ही प्रकाराचा दावा तुझा मजवर कायद्या प्रमाणें व मुसलमानी शास्त्रा प्रमाणें चालणार नाहीं. सर्व प्रकारे निभविण्यास मी हाजर आहे. या करितां मी तुला कळविले आहे व हल्लीं दिवस फारच फार महागाईचे असल्यानीं दोन दोन तीन तीन जागीं खर्च चालविण्यास मी असमर्थ आहे. आठ दिवसांत तूं आली पाहिजे अगर तुझे ह्मणणे लेखी काय आहे याचा जबाब आला पाहिजे कळावें तारीख ९ माहे जुलै सन १८९७ इ०

सही
महमद हाशम वल्द शेख मेहेबूब
निशाणी खुद्द कट्यार

### THE EDUCATION OF NATURE

Three years she grew in sun and shower
Then Nature said, 'A lovelier flower
On earth was never sown:
This child I to myself will take;
She shall be mine, and I will make
A lady of my own.

' Myself will to my darling be
Both law and impulse: and with me
The girl, in rock and plain,
In earth and heaven, in glade and bower
Shall feel an overseeing power
To kindle or restrain.

' She shall be sportive as the fawn
That wild with glee across the lawn
Or up the mountain springs;
And her's shall be the breatning balm
And her's the silence and the calm
Of mute insensate things.

' The floating clouds their states shall lend
To her; for her the willow bend;
Nor shall she fail to see
E'en in the motions of the storm
Grace that shall mould the maiden's form
By silent sympathy.

' The stars of midnight shall be dear
To her; and she shall lean her ear
In many a secret place
Where rivulets dance their wayward round,
And beauty born of murmuring sound
Shall pass into her face.

' And vital feelings of delight
Shall rear her form to stately height,
Her virgin bosom swell;
Such thoughts to Lucy I will give
While she and I together live
Here in this happy dell.'

Thus Nature spake— The work was done—
How soon my Lucy's race was run !
She died, and left to me
This heath, this calm and quiet scene;
The memory of what has been
And never more will be.

*W. Wordsworth*

### निसर्ग शिक्षा

प्रचंड रविच्या किरणीं केव्हां, केव्हां धारासारी ।
केव्हां पवनी शारदीय, जो अंगा झोंबे भारी ॥
कन्या सहजगती । वाढे वर्षत्रय जगती ॥ १ ॥
वनस्थली देवता तिला ती पाहुनि मनोभिरामा ।
वेद 'मनोरम चारु कुसुम हें महिवरती गुणधामा ॥'
'निरुपम काय लता ।कुणी पाहिली अशी दयिता ॥२॥
'वर्द्धन हीचें करीन शिक्षण हिजला देईन मीच वनी ।'
'सुग्राहिणी हिस बनविन सुंदर मदात्मजा ही असो जनीं, ॥
'निरुपम ही कन्या । कुणी पाहिली अशि अन्या, ॥ ३ ॥
'शासन पद्धति मीच मनातें हीच्या प्रेरुनि निर्मिलती ।'
'हिजला शिकविन वनांतरी या; कशास दुष्टा लोक-रिती ॥'
'निरुपम ही कन्या । कुणी पाहिली अशि अन्या ॥४॥
'उंच महीधर-शिखरावरती समभू भागी वृक्षगणी ।'
'महीवरी या सरिज्जली वा फिरविन हिजला नभोगणीं॥'
'निरुपम ही कन्या । कुणी पाहिली आशि अन्या ॥५॥'
'पर्वत कंदरीं लता कुंजि वा मत्सांगातीं फिरेल ही ।'
'प्रोत्साहित वा स्तंभित कन्या करिल मनाची प्रवृत्तिही ॥'
'देखुनि चित्प्रभुता । विश्वाधिष्ठित सत्ता ॥६॥'
शाद्वल भूषित भूमीवरती हृष्ट मनें-ती जेवि मृगी- ।'
'सलील तैसी मत्कन्या ही फिरेल येथें वनीं नगीं ॥'
'सेविल निमलजला । निर्झरणीचे ही अतुला ॥७॥'
'जड वस्तूंचें सूक्ष्म निरीक्षण करितां शांती मौग्ध्य तसें ।
'चित्त हिचें हे सहजगतीनें पाहुनि तें हितसें ॥
'गंधवहामोदा । स्वीकारुनि देईल मोदा ॥ ८ ॥
'जलद्रवटाही मंदगतीनें गगनीं फिरतां हिजलागीं ।
'हंस गतीची उन्नत शिक्षा देइल सत्वरि भूभागीं ॥
'लतिका नम्रपणा । शिकविती हिस जाणा ॥ ९ ॥
'वात्याचक्रगतीला पाहुनि वरील नवचारुता ; ।
'स्तिमितानुभव प्रदान यांगें त्याच्या ही वनिता ॥
'सहजचि काय लता । दाविल आपुली कांता ॥ १० ॥
मध्य रात्रिला चमकति तारे ते प्रिय होतील हिजला ।
'पर्वत कंदरि मध्यें पाहिल तटिनी ती स्वैरजला ॥
'मंजुल तन्निनदा । ऐकुनि प्राशिल तोय तदा ॥ ११ ॥
'मंजुध्वनि तटिनींचा कोमल कर्णीं पडता घोरवनीं ।
'भृंगाकुल पंकजसी हीच्या श्री येईल वदनी ॥
'निरुपय ही कन्या । कुणी पाहिली आशी अन्या ॥ १२ ॥
'पीयुषे युत ज्योत्स्ना जैसी उल्लसिता तत्कायलता
'हर्ष समुच्चय मनोवृत्तिनें खुलेल मग तत्वता ॥
'विमला हृद्वृत्ती । स्फुरता कुच येतील वरती ॥ १३ ॥
'नग सुख कंदरिं मत्सांगातीं वसती मग ही कन्या ।
'हल्कासारीं भाव विमल हे पाहतां युवति धन्या ॥
'होइल भूवरती । हिशी तोलणें काय रती ?॥१४॥
वनदेवी या परी बोलली—वाटे ललना विपिनीं ।
झाले तीचे हेतु सफल तों—प्रिया त्यजी अवनी ॥
जाई यमसदना । इतुक्या त्वकरि जाणा ॥ १५ ॥
जीवितदीप निमाला तुटला तत्सुकृताचा तंतु ।
मेली ती; जगीं अगम्य वाटे मनुजा विधि हेतु ॥
उरलों मी मागें । विव्हळ शोका वेगें ॥ १६ ॥
शाद्वल युत भूभाग सखीची क्रीडाभूमी येथें ।
प्रशांत पर्वत-पादप-तटिनी युत हि स्थल हें येथें ॥
येथें रम्य दरी । लताकुंज हा ज्या नसरी ॥ १७ ॥
ठेवुनि गेली या या वस्तु स्मृति मजला देती ।
भूत-काल-गत गोष्टींची तशि-पाहे न ज्या मी पुढती ॥
वक्रा कर्म गती । नराची वाट या जगतीं

मिती आषाढ शुद्ध १२ शके १८१९

सन १८९२-९३ पासून १८९५-९६ अखेरच्या तीन वर्षाची हकीकत इंडियांतील नोंदणी खात्याच्या स्थिती संबधानें प्रसिद्ध झाली आहे तिज वरून नोंदणीच्या कामांत जी वाढ किंवा कमताई होते तिच्या विषयीं कांहीं कारणें चांगलीं स्पष्टपणें कळून येतात. मद्रास सरकारचें असें मत आहें कीं त्या इलाख्यांत जमिनीचे पट्टे फार वर्षाचे व किंमतीचे होतात त्याला एक कारण शेतीच्या

धबांत भांडवल घालण्याची लोकांची मोठी हौस होय. पीकपाणी चांगलें झालें तर नोंदणी साठी कागदपत्र कमी येतात. मुंबई इलाख्यांत लग्नें वगैरे ज्या सालीं पुष्कळ होतात किंवा पीकपाणी वाईट असतें त्या सालीं नोंदणीचें काम वाढतें. वायव्य प्रांतांत नोंदणीं साठीं दस्ताऐवज अधिकाधीक आले याचें कारण शेतीची बुडणूक व शेतकऱ्यांचा ऱ्हास हीं आहेत. मध्यप्रांत, ब्रह्मदेश, आसाम वगैरे मुलूखांत देखील वरील कारणें पक्केपणीं स्थापित होतात.

वरील कारणें आमच्या प्रांताला बरोबर लागू पडतात.

| साल | नोंदलेले दस्ताऐवज | इस्टेटीची किंमत |
|---|---|---|
| १८९२-९३ | ३२१४० | ९८ लक्ष |
| १८९५-९६ | ३५५९८ | १२१ ½ लक्ष |

या आंकड्या वरून हा प्रांत सांपत्तिक स्थिती संबंधानें खालावत चालला आहे असें दिसून येईल.

---

पुण्यास लेफटेनंट एअर्स्ट यांचा खून झाला व मि. रांड हे गोळी लागून मरण पावले पण या दुष्ट कृत्याच्या अग्निशलाका सर्व राष्ट्रभर पसरल्या आहेत. नेटिवांविषयींचा द्वेषभाव व मत्सरबुद्धि हीं अगदीं उचंबळूं लागलीं आहेत. नेटिव वर्तमान पत्रांवर आग पाखडण्या विषयीं आंग्लो— इंडियन पत्रकार आपलें पुण्य खर्चीत आहेत. सर्वत्र एकच हाहाकार करून सोडला आहे. एकंदरीनें सर्व स्थिती मोठी भयंकर आहे. आणि मुंबई सरकारा सारख्या जुन्या, सुधारलेल्या व वजनदार सरकारानें अगदीं गैरशिस्त व अन्यायाच्या गोष्टी आरंभल्या आहेत ह्मणून मोठी चिंता व आश्चर्य वाटतें. कित्येक आंग्लो-इंडियनांनी नेटिवांवर व त्यांच्या वर्तमानपत्रकारांवर लेखांत राजद्रोह दिसतो तर आंग्लो इंडियन पत्रकारांच्या लेखांत प्रजाद्रोह, नालस्ती, चिडविणारे व अस्वस्थता उत्पन्न करणारे उद्गार हीं ओतप्रोत भरलीं असतात. राजद्रोह या शब्दाची व्याख्याच अगदीं बदलून टाकली आहे. सरकारचे दोष दोष दाखविणें, त्याच्याशी सलगीचें नातें लावणें, इष्ट गोष्टी मोकळेपणानें मागून घेणें, इकडील अधिकाऱ्यांची किंमत पारखणें किंवा अशाच प्रकारची गोष्ट राजमार्गानें करणें देखील राजद्रोह होतो. पुण्याच्या केसरी सारख्या वजनदार व नामांकित पत्रावर गालीदानाचा वर्षाव केल्यानें त्या पत्रांची महती वर्णन केल्या प्रमाणेंच होत आहे. व्यक्तिविषयक हल्ले फार प्रचूर आहेत. नामदार बाळ गंगाधर टिळक हे कायदे कौंसिलदार पुन्हा झाले ही गोष्ट आंग्लो इंडियनांच्या मनांत विषशल्या प्रमाणें टोंचत आहे. पुण्याचा ब्राह्मणवर्ग ह्मणजे खुनी व मारेकरी यांचा वर्ग आहे असें बेधडक प्रसिद्ध करितात. अशा लेखकांवर फौजदारींत फिर्यादी करून प्रजेची स्वस्थता पूर्ववत् ठेवावी ही गोष्ट खरोखर जरूरीची दिसते. पुण्याचे कलेक्टर मि. लांब यांचे हृदयस्थ विचार प्रकाशित झाले तेव्हां त्या क्षयकारी विद्युत्पाता खालीं सर्वांचीं मनें देहभानावरून उडालीं. जादा पोलीस पलटण ठेवण्यांत आली आणि प्रजेवर सरकारच्या अतुल शक्तीचा महिमा गानविण्यास प्रारंभ झाला. दोन युरोपियन अधिकारी मेले ही जगाच्या राहटींतील गोष्ट आहे. वैमनस्य, हाडवैर, जीवाची बेपर्वाई, सर्व देह हालविणारी नाजूक गोष्ट इत्यादि कारणें एकत्र झालीं ह्मणजे असले अनर्थ अनेक प्रसंगीं गुदरतात. या प्रकारांत कांहीं राजकीय अंग नाहीं व राजकीय हक्कप्राप्ती किंवा दुःखविमोचन अशा खुनांनीं होत नाहीं हें सर्वांस कळत आहे.

पुण्याचे खून ही राष्ट्रीय आपदा झाली आहे. नेटिव वर्तमान पत्रा बदल कडककायदा करण्या विषयीं सरकारी वरिष्ट अधिकारी आपलीं भडकलेलीं डोकीं खर्च करीत आहेत. अशा समयीं एक बाबूळवृत्ती नामदार भावनगरी आपले मताची दांडगी मदत सरकारास देत आहेत ही गोष्ट ध्यानांत धरण्या सारखी आहे. सरकार व प्रजा यांच्या मध्यें द्विधा भाव, मत्सर व द्वेष यांची प्रेरणा आंग्लो इंडियन पत्रकार करीत आहेत आणि त्यांची वृत्ती हितशत्रू प्रमाणें आहे. वीस हजार रुपये बक्षीस लागलें आहे तथापि एक कायदा शिकणारा विद्यार्थी पकडला आहे अशा गप्पा अलिकडे ऐकण्यांत येत नाहींत. हें दुश्चिन्ह होय. वातावरणांत बातमीच्या व विद्युत्संदेशाच्या तोफा कांहीं आंग्लो-इंडियन पत्रकार उडवितील तर मोठी मौज वाटेल व प्रस्तुतचा प्रजाजनांचा अस्वस्थपणा कायम राहिल. लेफटेनंट एअर्स्ट व मि. रांड हे परलोकच्या सुखाचा अनुभव घेत आहेत तथापि त्यांच्या मरणामुळें घडलेली प्रजेची व सरकारची दुफळी त्यांस दुःख देईल यांत कांहीं संदेह नाहीं. मुंबई सरकारानें आंग्लो-इंडियन पत्रकर्त्याला कांहीं बोध करावा अशी आमची साविनय सूचना आहे. इंडियन पिनल कोडाची कलमें अपराध्यांस शिक्षा करण्यास पुष्कळ मजबूत आहेत आणि हीच गोष्ट नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांनीं आपल्या मुसलमानभाईस उपदेश करितांना कळविली. निंदाव्यंजक लेखांनीं व भाषणांनीं इंडियनांचा छळ होऊं देण्या पेक्षां त्यांच्या पत्रकारांस न्याय देवते समोर उभे करणें विशेष फायदेशीर होईल.

---

यंदाची राष्ट्रीय सभा उमरावतीस भरणार आहे ह्मणून तिच्या व्यवस्थे विषयीं वऱ्हाडवासी राष्ट्रभक्तांवर मोठीच जबाबदारी आहे. हें वर्ष मोठ्या आपत्कालाचें गेलें. लोक दुष्काळानें अगदीं हवालदील आहेत. त्यांची दशा मरणप्राय झाली आहे. अशा वेळीं त्यांस काय ह्मणावें आणि त्यांनीं तरी राष्ट्रकार्याला काय मदत करावी हें उघड दिसत आहे. राष्ट्रीय सभा ह्मणजे सामान्य गोष्ट नाहीं. मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद, सारख्या राजनगरींत देखील सर्व व्यवस्था होण्यास मोठी मारामार पडते पण ही जबाबदारी सर्व राष्ट्राच्या संकल्पानें या प्रांताच्या लोकांवर आली आहे. वेळ तर आणीबाणीची, संकटाची व परीक्षेची आहे. या कसोटीला आमची धूरीण मंडळी चांगली टिकतील असें त्यांचें चननवलन, कार्य निष्ठा व स्वार्थत्याग यावरून दिसून येतें, बिकट प्रसंगींच माणसाची खरी योग्यता कळून येते आणि आह्मास पक्की उमेद आहे कीं आमची मुख्य मुख्य थोर मंडळी या समयाला न डगमगता सर्व देशाकडून वाहवा मिळवून घेतील. वर्गणी गोळा करण्याचें काम बंद पडल्या प्रमाणेंच झालें होतें. जसजशी सभेची वेळा समीप येत चालली तसतशी तारंबळ व गर्दी विशेष उडाली आहे हें पाहून आनंद वाटतो. राष्ट्रसेवेविषयीं लोकांची आवस्था व कळकळ वर्णनीय आहे ह्मणूनच अशा दुष्काळसमयीं देखील उमरावतीस स्वागत मंडळीची नेमणूक करण्याविषयीं वाटाटाटी काल चालणार होत्या. राष्ट्रीय सभा निर्विघ्नपणें पार पडणार आहे असें भाकित मोठ्या दूरदृष्टीनें आह्मी करीत आहों. ईश्वर करो, सर्वत्र आबादानी होऊन आमचें राष्ट्रकार्य सिद्धीस जावो !

---

पर्जन्यानें निराशेंत आशा उत्पन्न केली. पण अद्याप आनंद मानण्यासारखा पाऊस झाला नाहीं. अरबी समुद्रांत वादळ सुटल्या विषयीं माहिती लागते. वारा नैरृत्य दिशेचा असतो, आणि ढगांची चळवळ गर्दीची आहे या लक्षणावरून पाऊस चांगला लवकरच होईल असा अंदाज आहे. कित्येक स्थळीं पाऊस आहे, कित्येक स्थळीं कांहींच नाहीं व कोठें कोठें तुरळक आहे इत्यादि प्रकार थोडथोड्या अंतरावर अनुभवास येतात. दुष्काळाचा उग्रपणा कमजोर होत आहे आणि देवदयेनें स्वल्पकालांतच सर्वत्र आबादानि होईल. यंदाच्या वृष्टीवैचित्र्याला खंडवृष्टि अशी संज्ञा आहे.

हल्लींची लोकांची दैना पाहून मनाला उद्विग्नता व निराशा वाटते. पाषाणा सारखें हृदय करून डोळ्यावर कातडे ओढावें लागतें सर्व चित्तवृत्ती ईश्वरांचा धांवा करितात आणि ईश्वरी कृपेचा वर्षाव व्हावा ह्मणून मन तल्लीनतेनें त्यांसच शरण जातें. पावसाळा चांगला सुरू होईल तर दुष्काळग्रस्तांची निवाऱ्याची जागा नाहीं, कपडालत्ता नाहीं, अंगांत ताकद नाहीं व मोलमजूरी शिवाय भूकेची आग निवविता येत नाहीं. अशी कष्टमय दशा आमच्या लोकांस प्राप्त झाली आहे. पेरणीच्या कामाकडे कांहीं लोक लागले तरी पुष्कळांचें प्राणरक्षण सरकारांतून झालें पाहिजे. खानगी वर्गण्यांनीं बऱ्याच लोकांचा निभाव लागला आणि उदार लक्ष्मीपुत्र ईश्वरी कृपा ओळखून आपल्या बांधवांस यथाशक्ती मदत करीत आहेत. तथापि सरकारनें गोरगरीबांस मदत देण्या साठीं मोठा फंड खर्चला पाहिजे. आमच्या जिल्ह्यांत इतर ठिकाणांच्या मानानें मोठी खटपट चालूं आहे आणि मे. श्रीडो साहेब यांची गरीब लोकांविषयीं कळकळ विशेष दिसते. पण या पेक्षां फंडाची तजवीज अधीक पाहिजे. या खेरीज सरकारी मदत खेड्या पाड्यांतून फार पाहिजे. लोकांस त्यांच्या घरादारांपासून लांब ठेविलें तर पावसाच्या दगदगीमुळें त्यांचा टिकाव लागणार नाहीं. शेतकामाला जोडगोळी ह्मणून दुसरी कांहीं कामें मुख्य मुख्य खेड्यांतून निघालीं पाहिजेत ह्मणजे गांवससफाईचीं किंवा तशीच अन्य सार्वजनिक कामें होऊन लोकांस आपापल्या खेड्या नजिक मोलमजूरी मिळेल.

---

The Berar Samachar

MONDAY JULY
12 1897

## ORGANISATION IN INDIAN LIFE
### No. 2

In our last issue we have explained that the front rank in political life is assumed by the class of pleaders as a whole though it would be more fitting if a leisured class of literary and developed attainments were to occupy a prominent position. Today we wish to point out to a large body of people when we desire to take a more leading and active part in the battle of privileges which is being waged against the rulers in the light and principle of the education imparted by the noble British Government.

Knowledge is power. But the adage is literally true when knowledge is backed up by money. We would say money is power and knowledge its pilot. Without the help of the other one of these is impotent and harmless. The Educational Departments of the different provinces have called into being a new class of men who can next to pleaders take the field. But from the Dark Ages upto the present times, this class has not been recognised and fully appreciated as it ought to have been. This class has knowledge but no money. Its sphere of action is confined to mere boys. Experience teaches us that mere mercenary and sordid views of school masters act powerfully on the future of boys. They may pass certain examinations but the outturn is impoverished and intellect and vigor made crooked. In fact a school master is thus debarred from doing any service to his country either in immediate or in prospective future. Being without money and being precluded from intercourse with monied business—people his knowledge dies on the heart like the sweet music of a nightingale. A sort of animosity springs up between the more powerful class of pleaders and the more fitted but despised class of school masters. This is the real origin of long existing discussions between village school masters and village pleaders. In one there is conscientiousness of knowledge exclusively devoted to some definite problem and a carping chargrin consequent on neglect and in—apprciation. In the other there is conscientiousness of knowledge backed up by an effective power of public influence and money. We have long perceived this raucour. We have ever done what we could do to establish a sort of corporation and friendliness between these two classes. If a pleader has more money and influence a school master has more opportunities for exclusive devotion to certain branches of knowledge and a free stock of it. What wonder will be achieved if there were a hearty cooperation between these classes the present ornaments of the Indian nation.

Next in order comes the class of journalists and medical practitioners. We are aware a school master under the awful control of the British Government is strictly prohibited from contributing to newspapers his views on any subjects he may have carefully studied. Yet the Indian journalism is for the most part solely maintained by this class or the class of legal practi—tioners. So we leave journalists out of question. The medical profession has yet to do a good deal for this country. It has to set down to us all the times of our nourishments and to prescribe them scientifically proposing such changes as are in keeping with our religious observances and religious prohibitions. This done, they may materially con—tribute to our life being rendered com-

fortable, endurable, and agreeable. So long as they have so much to accomplish in their own field no solid service can be expected from them.

We have thus to relie on the more enlightened classes of school masters and pleaders. We have discussed on the bold necessity of a cooperation among them. Suppose it were likewise secured. The next problem is as to what this class of highly educated men should do towards the advancement of this country. These times are now becoming very hard times. The primæval efforts of translations and speechifications we have in plenty. To tread a path of those who have preceded us leaves nothing for us. We can only outshine them by abusive language. Our most admirable feats will thus be confined to inventing an intelligent abusive language. Will this materially raise our condition? Will this go to our nation-making? Will this establish better relations between the powerful rulers and the feeble ruled? The answer is palpabl no.

In our rulers there ought to be more sympathy and more frank and settled intercourse pervading. In the ruled there ought to be an exclusive devotion to one only particular aim and one only particular branch of study. If this were secured much of our present discontent will disappear.

## वऱ्हाड

हवामान— पर्जन्याची खंडवृष्टी होत आहे. अभ्रमंडप चांगला बसला आहे तथापि स्थळोस्थळींचेच ढग ओसरतात आणि त्या मुळें पाऊस सारखा सर्वत्र होत नाहीं. अगदीं चार पांचशे हातांच्या अंतरामध्यें कोठें पाऊस आहे व कोठें नाहीं असा चमत्कार विशेष आहे. बहुत ठिकाणीं पेरण्याचीं कामें चालू झालीं. रोगराई जोरावर आहेत व हवेचा उपद्रव चालूंच आहे.

अकोला मुनसिपालिटींत हलालखोरीचा कर घर भाड्याच्या उत्पन्नाच्या अंदाजावर आकारण्यांत येत जाईल. या नवीन फेरफारामुळें मुननिपालिटीचें उत्पन्न पुष्कळ वाढेल असा अदमास आहे. कराची आकारणी येणेंप्रमाणें:—

| घराच्या भाड्याचें सालीना उत्पन्नाची मर्यादा | कराचा आकार | |
|---|---|---|
| रुपये | रु० | आ० |
| ६ | २ | ८ |
| २५ | ३- | |
| ५० | ५ | |
| १०० | ७ | |
| २०० | १० | |
| अमर्याद | १२ | |

औरंगाबाद, मोमिनाबाद, व जालना या छावणींतील माजिस्त्रेटांचे उल्लेख 'जुडिशिअल सुपरिंटेंडंट' या नांवानें केला जाईल.

मि० जे. आर. आग्रेडी ए० असि० कमिशनर यांस बडनेऱ्याहून उमरावतीस बदलण्यात आहे.

रा. रा. रघुपती मोहनराव, तहशिलदार वर्ग ३, मूर्तिजापूर यांस गेल्या १ ले तारखेपासून २॥ महिन्यांची हक्काची रजा मिळाली आणि त्या रजेंत मि० सेराबजी शापूरजी नायब तहशिलदार वर्ग १ यांस तहशिलदार नेमण्यांत आलें.

हास्पिटल असिस्टंटाच्या बदल्या झाल्या आहेत त्या अशाः—

| हास्पिटल असिस्टंट मिस्टर | बदलीच्या दवाखान्याचा गांव |
|---|---|
| सी. नागभूषण | उमरखेड. |
| केशव तुकाराम | दारव्हा |
| कृष्णय्या सुब्रय्या | जलगांव |
| अबदूल करीम | नेर. |
| चिंतामण हरी | मालेगांव |
| अंबादास गणेश | वाशीम |

रा० रा० वामन रघुनाथ जोशी डिपुटी इनस्पेक्टर, यवतमाळ, हे गेल्या ७ वे तारखेपासून तीन महिन्यांच्या रजेवर गेले आहेत. त्यांच्या रजेंत तेथील हेड मास्तर रा. रा. कृष्णराव रामचंद्र काळे बी. ए. यांज कडेस डिपुटी इनस्पेक्टरचे जाफा काम सोंपविलें आहे.

रा. रा. मारुती हरी, क्लार्क आफ कोर्ट, सेशन कोर्ट, यांस यवतमाळचे डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट नेमिलें. आणि तेथील रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस दर्यापुरास आक्टिंग तहशिलदार नेमिलें आणि दर्यापूरचे तहशिदार रा. रा. कृष्णाजी अनंत यांस चांदूर बजार येथें तहशिलदार नेमिलें.

रा० रा० गिरराव रामचंद्र तहशिलदार वर्ग १ यांनीं पेनशन घेतल्यामुळें त्यांच्या जागीं खालील बढत्या देण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | तहशिलदार वर्ग |
|---|---|
| वामन गणेश, वणी | १ ला |
| कृष्णाजी अनंत, चांदूर बजार | २ रा |
| महमद शाबासखान, खामगांव | ३ रा |
| लक्ष्मण गोपाळ देशपांडे अकोला | ४ था |

## आकोला बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९३ रुपये |
| जवारी | १२४ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३०.८० |
| ,,( बनशी ) | १५० रु० |
| चणे | १३५ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ८॥= मण |
| सोनें | २५ तोळ |
| चांदी | ८४ |

मोर्शीहून एक ग्रामस्थ (३०।६।९७) कळवितात कीं मृग व आर्द्रा या नक्षत्रांनीं दगा दिला. लोकांच्या तोंडचें पाणी पळालें आहे शेतीचें काम तहकूब आहे. गुरांची दशा हृदयद्रावक आहे. धान्याच्या कडक भावामुळें लोक अन्नावाचून मरत आहेत. भिकारी फार आहेत. त्यांच्या हाडांचा सांपळा पाहिल्याबरोबर अंतःकरणांत कलवलतें. चिंचेचा पाला, शिंदीचा गाभा इत्यादिकावर कित्येक प्राण जगवितात. सरकारचीं कामें पुष्कळ निघालीं पाहिजेत. रिलिफ कामावर लोकांच्या मगदूरा प्रमाणें काम घेतलें पाहिजे. गरीब लोकांस धान्य स्वस्त मिळेल अशा विषयीं मोठी खटपट झाली पाहिजे. सर्व हवाला देवावर!

कारंजा, ता० १०।७।९७.

हें शहर बऱ्याच दिवसांपासून व्यापाराची पेठ असल्या मुळें प्रसिद्ध आहे. अलिकडे आठ दहा वर्षांपासून येथें कापसाचा व्यापार वाढल्यामुळें लोकवस्तीही वाढून व्यापारास बरीच भरभाटी आली आहे. हल्लीं येथें कापसाचे जिन, प्रेसचे तीन कारखाने चालूं असून चवथा कारखाना येथील प्रसिद्ध सावकार रामजी नाईक काळव व इतर मंडळी मिळून चालविण्याचें ठरून बांधण्याचें काम सुरूं आहे. एकंदरीनें येथें व्यापार बऱ्याच जोराचा चालत आहे. परंतु रेल्वेची सोय या शहरास नसल्यानें लोकांस फार अडचण पडते. अलिकडे इंगोलीकडे रेल्वेचा फाटा नेण्याचा विचार बरेच दिवसां पासून चालत असल्याचें ऐकिवांत आहे, तो मूर्तिजापूर स्टेशना पासून या शहरा वरून वाशिमाकडून नेण्यास हीं दोन्ही बरींच मोठीं शहरें असल्यानें रेल्वेस अधिक फायदा होण्याचा संभव आहे.

अनाथ गृह— येथें दुष्काळा प्रीत्यर्थ गरीब लोकांस फुकट अन्नदान करावें, म्हणून जनाब डे० कामिशनरर साहेब बहादूर यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरून १६०० रुपये वर्गणी झाली. शिवाय इतर जमलेल्या फ्यामिन् फंडांतून खर्च करून गेल्या एप्रिल महिन्या पासून अन्नदानाची सोय झाली आहे. तारीख ७ जुलै १८९७ इ. रोजीं सुमारें १०० लोक त्यांत होत. थोडे दिवसांपूर्वी जनाब डे० कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी येथें आली होती तेव्हां त्यातील काम करण्या लायक मनुष्या करितां खडी फोडण्याचा कारखाना काढून तिकडे बरेच लोक कामावर लावले व येथील तलाव खोदण्याचेंही काम काढावें असें आ. साहेबांचें मत दिसलें.

अपूर्व चमत्कार—येथें थोडे दिवसांपूर्वी मागील ऐकिवांत असलेल्या दंतकथे सारखी एक गोष्ट प्रत्यक्ष घडून आली ती अशी:— एक बाई आपलें सात दिवसाचें तान्हें मूल खाटेवर ठेवून घरांत कांहीं कामाकरितां गेली. व कांहीं वेळानें परत येऊन पाहते तों मूल येथें नाहीं तेव्हां घाबरून आसपास तपास करितां पत्ता लागेना, या मुळें तेथें बरीच मंडळी जमली. या गांवांत वानर फार आहेत तेही त्या घराशेजारी एका झाडावर होते. इतक्यांत मंडळींतील एकाचें लक्ष तिकडे गेलें. तों एका वानरीनें तें मूल आपल्या पोटाशी धरून आपल्या पिला प्रमाणें त्यास कुरवाळीत आहे असें दिसलें तेव्हां सर्वांस आश्चर्य व मूल जिवंत राहतें किंवा नाहीं अशी भीति उत्पन्न झाली. मुलाचे आईनें तर रडून अनर्थ मांडला परंतु काय फळ! इतक्या अवकाशांत हा अपूर्व चमत्कार पाहण्यास मंडळींची खुबच गर्दी झाली व गलबलाही फार होऊन जो तो आपले विचार बोलूं लागला. पुढें ती वानरी त्या मुलास आपल्या पोरांप्रमाणें पोटाशीं धरून उडण्याचा प्रयत्न करूं लागली परंतु या मुलास तें कोठून साधणार! शेंवटी तिनें आपला प्रयत्न साधत नाहीं असें पाहून त्या उंच स्थळाहून मूल पोटाशीं धरून एक दोन घरां वरून उड्या मारीत खालीं येऊन मुलांस जागच्या जागीं सर्व मंडळी समक्ष आणून ठेविलें व आपण निघून गेली. तिला तें आपलें पोर तर वाटलें नसेल ना? हल्लीं तें मूल सुरक्षित आहे. ईश्वरी माया अगाध आहे!

### नोटीस

गंगाभागिरथी काशीबाई नवरे गोपाळराव देशपांडे राहणार दर्यापूर परगणे दर्यापूर ता. मजकूर जिल्हा एलिचपूर अ. पा. जनक बाप केशव कृष्ण मोहरीर देशपांडे मुर्तिजापूर हल्लीं कारकुन कोर्ट तेल्हारा यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही अज्ञान विश्वंभर याजला दत्तक घेतल्या पासून देशपांडे पणाचें वतन संबंधी स्थावर जंगम इस्टेटची व्यवस्था बरी ठेविली असावी असे मला वाटत असे तसेच अज्ञानाची काळजी ठेविली असे ही वाटत होते परंतु तुम्ही इस्टेटची व अज्ञानाची काळजी न बाळगतां वागला. आणि इस्टेटिची व्यवस्था बरोबर न ठेवितां अज्ञानावर कर्जाचा बोजा ही करून ठेविला. असे मला कळतें करितां जगजाहीर नोटीस दिली जाते कीं तुम्ही अज्ञानाचे वतन वगैरे संबंधानें कर्जाचा बोजा करून ठेविला असेल व कराल तर अज्ञानाची स्थावर जंगम इस्टेट कर्जाचे फेडीस पात्र होणार नाहीं हे खात्रीने समजावे व जें जें वाईट काम कराल त्याचा परिणाम आपल्यास स्वतः भोगावा लागेल व कर्ज देणारे साहु लोकांसही भोगावे लागेल. अज्ञान हा कोणतेच प्रकारचा कर्ज संबंधीं जबाबदार राहणार नाहीं. तसेच कोणतेही प्रकारचा व्यवहार केला असतांहीं त्याचा ही तो जबाबदार नाहीं. कळावे तारीख १० माहे जुलै सन १८९७ इसवी.

( सही )
केशव कृष्ण मोहरीर देशपांडे
मुर्तिजापूर हल्लीं वस्ती तेल्हारे
दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा. रा. दत्तू वा॥ गंभीरजी पाटील उगले मौजे कळंब बुजरुख तालुके बाळापूर यास नोटीस देणार रामजी वा॥ वीरभानजी पाटील मौजे कसुरे तालुके बाळापूर नोटीसीनें असे कळवितो कीं तुम्हाकडे आमचे खाते बाकीचे येणें व तारणगाहान घर जमीन वगैरे मिळून येणे आहेत.

सदर्हूवर लिहिलेल्या दोन्ही तपसीलाचे रुपयें जे आहेत ते रीतशीर हिशेब करून आमचा निकाल नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचें आंत निकाल करावा असें झालें नाहीं तर सदर्हूवर नमुद केलेल्या दोन बाबींचे आमचें येणें त्यांस दरमहा दरशेकडा रुपये २ दोन प्रमाणें व्याज आखेर निकाल होईल तो पर्यंत ह्या नोटीशीच्या खर्चासुद्धां व इतर सर्व खर्च रीतशीर जो खर्च होईल तो अखेर निकाल होईतो पर्यंत सर्व खर्च भरून घेतले जाईल. हे तुम्हास अगोदर कळविलें आहे. म्हणून दिल्ही नोटीस सही तारीख ९।७।१८९७ इसवी.

सही
रामजी वल्लद वीरभानजी पाटील
दुकान कसुर दस्तुर
नागोजी रामजी
कसुरे

## वर्तमानसार.

वेदमूर्ती रा. सदाशिवभट सखंभट वैशंपायन नागांवकर हे कळवितात कीं, मंगळ व रवि यांची शर्यत आषाढ व. १ पासून दोन महिने पर्यंत लागणार असल्यामुळें ह्या अवकाशांत कांहींवेळ अतिवृष्टी व कांहींवेळ अनावृष्टी असा योग आहे. करितां नदीच्या कांठीं जे गाव असतील त्यांनीं आतांपासून सावध राहून आपल्या रक्षणाचे उपाय योजून ठेवांव. वे. मू. भटजीचा ह्या वेळींच मिळालेल्या सूचनेचा लोकांनीं योग्य उपयोग करून घ्यावा, असें आमचें सर्वांस सांगणें आहे.

खेड तालुक्यांत पिंपळगांव नांवाचें एक खेडें घोडनदीच्या कांठीं आहे. तेथें एका मराठ्याचा मुलगा वर्षापूर्वी महामारीच्या वाऱ्यानें मेला असून त्यांस चालीप्रमाणें पुरून टाकलें होतें. पण गेल्या महिन्यांत ह्मणजे सुमारें १३ महिन्यांनीं त्या मुलांस त्याच्या बापानें उकरून पुष्कळ लोकांदेखत जिवंत बाहेर काढलें व तो मुलगा अद्याप जिवंत असून त्याच्या दर्शनास मोठी यात्रा भरत असते असें एक गृहस्थ मंचराहून कळविते. ही गोष्ट खरी असल्यास अद्भूत चमत्काराची होय, यांत संदेह नाहीं. हा मजकूर लिहून गेल्यावर वाईच्या मोदवृतांत एकानें सहीनिशी पत्र छापलें असून त्यांत सदर्हू मुलाचें नांव शंकरराव असून बापाचें नांव व्यंकटराव व अडनांव पोखरकर अशी माहिती दिली आहे. ईश्वराचे अद्भूत चमत्कार पहाण्याची ज्यांना हौस असेल त्यांनीं सदर्हू गांवीं अवश्य जाऊन उभयतां पितापुत्राचें दर्शन घ्यावें अशी आमची शिफारस आहे.

पु० वै०

आषाढ मास. जुलै १८९७ शु० ४ रविवार ता.४।७ या दिवशीं वृष्टी झाल्यास अल्प होईल. शु. ५ सोमवार ता. ५ या दिवशीं बरीच वृष्टी होईल. शु. १५ सोमवार ता. १४ या दिवशीं जोराची वृष्टी होईल वद्य. ३ व ४ शुक्रवार व शनिवार ता. १६ व १७ या दिवशीं चांगली वृष्टि होईल. मुंबईच्या अक्षांस रेघांश संबंधानें केलेल्या पटवर्धनीय पचांगावरून वरील पर्जन्य विचार लिहिला आहे. त्याचा पूर्ण अनुभव मुंबईच्या सभोंवार १०० कोशांत तरी येईलच. वर लिहिलेल्या तारखांस समर्थी पर्जन्य न पडला तरी पर्जन्याची हवा तरी झाली आहे असा अनुभव पत्रांत तरीं येईलच.

जनार्दन हरि आठल्ये.

काबूलच्या आमिरानें पायदळ लष्कराच्या दोन तुकड्यांस गिझनीहून निघून हजाऱ्यास जाण्याबद्दल एकदम हुकूम फर्मावला आहे.

धी विक्टोरिया पास्टयुट इंन्स्टियूटच्या फंडांत मुंबईतील प्रसिद्ध आगाखानानीं एक लक्ष रुपयांची रक्कम भरली आहे.

टोकीच्या खाडीवर लष्कर व लष्करी सामान पाठविण्यांत सुलभ पडावें ह्मणून सिंधुनदीवरील होड्यांचे २० पूल बांधण्यांत आले आहेत.

टर्की व ग्रीस यांच्या लढाईच्या संबंधांत ग्रीसपासून टर्कीस किती दंड देववावा याचा विचार करण्याकरितां नेमलेल्या कमिशनानें असा रिपोर्ट केला आहे, आधिकांत अधीक ४० लक्ष पौंडापेक्षां अधीक दंड देण्यास ग्रीक शक्तीमान नाहीं.

व्हिक्टोरिया राणीसाहेब गादीवर बसल्या पासून गेल्या साठ वर्षांत अमेरिकेचे १७ प्रेसिडेंटे झाले.

महाऋण—निजाम सरकारनीं कलकत्याच्या लोकांकडून एक कोट रुपये कर्ज काढण्याचे ठरविलें असून तेथील बंगाल ब्यांकेनें त्या कर्जाचे टेंडरही निजामाकडे पाठाविलें आहे.

मोगलाईत परंडे गांवीं भरदिवसा बारा वाजतां एका गुजराचे घरावर दरोडा पडून बराच विषय जाऊन तीन चार खूनही झाल्याची दाट वंदता आहे.

हिंदुस्थानांत दरसाल २०,००० लोक सर्पदंशानें मरतात.

कैदी, भिकारी आणि मेलेलीं माणसें याचे १० लाख रुपयांचे केंस दरसाल चिनाच्या बाहेर जातात.

न्यूयार्क ( अमेरिका ) शहरांत दरसाल ३॥। लाख ग्याळन कन्डेन्स्ड मिल्क ( आटींव दूध ) खपतें

तंबाखू ओढण्यांत सगळ्या जगांत पहिला नंबर हालंड देशाचा; दुसरा बलजियमचा तिसरा तुर्कस्थानचा, चवथा युनाइटेडस्टेटचा, नंतर जर्मनी, फ्रान्स, स्पेन, इताली वगैरे येतात. यावरून इंग्लंडचा नंबर बराच खाली लागतो ह्मणावयाचा.

वीज एका सेकंदांत २ लक्ष मैल प्रवास करिते असा अनुभव आला आहे. यावरून तिला पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास अवघी २० मिनिटें लागतील.

अ०

धेड ब्राह्मण—हें हेडिंग पाहून वाचक ह्मणतील कीं, एडिटरला वेड लागलें नाहीं, तसा प्रकार नाहीं. खरोखरच जगांत धेड ब्राह्मण आहेत ! ब्राह्मणामध्यें नानाप्रकारच्या जाती आहेत. कर्मनिष्ठ अस्सल ब्राह्मण वेगळे. केवळ कार्तिक स्वामीचे भिडेनें ब्राह्मण जननीला शीणवून त्या कुलांत मात्र जन्मास आलेले, परंतु स्वैर आचरणानें पावन झालेले नानाविध ब्राह्मण आहेत. आपापल्या कर्तबगारीचे जोरावर कोणी मराठे ब्राह्मण झाले आहेत, कोणी मुसलमान ब्राह्मण झाले आहेत, कोणी धेड ब्राह्मण झाले आहेत ! ज्या जातीकडून गुप्त कां होईना पुनीत झाले आहेत, त्या जातीचें नांव मिळाविलें आहे. ही ज्याची त्याची पूर्व पुण्याई आहे. आज या गोष्टीचें स्मरण होण्याचें कारण असें कीं नुक्ते एके ठिकाणीं कांहीं धेड ब्राह्मण अत्रचित आढळले आहेत अशीं खबर आहे. या ब्राह्मणानां गोमांसाची गोडी लागून ते नित्य नियमानें रात्रीं गुप्तपणें सोल्जराचें उच्छिष्ट ( आह्मी चुकलो–प्रसाद ) भक्षण करण्याला जात असत. ही गोष्ट तेथील अधिकाऱ्यानां कळून त्यांणीं त्यानां पकडलें आणि त्यानां उघडकीस आणलें असें ह्मणतात. ही मोठी संतोषाची गोष्ट होय. आमचें मतें, मराठे ब्राह्मणापेक्षां मुसलमान आणि धेड ब्राह्मण ब्राह्मण फार पूज्य आहेत. कोणा भोळ्या भाविकानां मनोभावानें ब्राह्मणाची आणि गाईची पूजा करून चरणतीर्थ घ्यावयाचे असल, तर त्यांणीं मुसलमान आणि धेड ब्राह्मणाकडे जावें. कारण ब्राह्मणाची आणि पृथक् पृथक् पूजा करण्याची यातायात नको. मुसलमान किंवा धेड ब्राह्मणाला पुजलें ह्मणजे त्यांत सर्व आलें. त्यांच्या पोटांत गोमाता आहेच ! अस्तु.

धा० वृ०

पुण्यास जे यूरोपियनाचे खून झाले त्यासंबधांत लंडन येथील 'ग्लोब' हे 'पालमाल ग्याझेट' या पत्रांनीं असें लिहिलें आहे कीं, पुण्यात जो दंगा झाला त्यास मुख्य कारण वर्तमानपत्राचे लेख होय. करितां माजी व्हाईसराय लॉर्ड लिटन यांच्या अमलांत देशी वर्तमानपत्रासंबंधी जो कायदा तयार केला होता तो चालू करावा. स. वि.

बाजार लुटला— पिंपळनेर ता० साकरी, येथील बाजार लुटला गेल्याचें वर्तमान ऐकिलें आहे.

कर्नाटकांत उत्तम पाऊस पडून पेरण्या तमाम सुरू आहेत.

कालिकत व कोचीन येथें आजपर्यंत २० इंच पाऊस पडला.

बरली एथें एका महाल्यांत गस्त घालणारा पोलीस कानस्टेबल एका ठिकाणीं झोंपी गेलेला पाहून एका चोरानें त्याचें दोन्ही कान कापलें. शिक्षा चांगली झाली.

डायमंड जुबिलीप्रीत्यर्थ सर्व हिंदुस्थानांतील मिळून २,००० कैदी बंदमुक्त झाले.

पंढरपूर— पर्जन्यानें बहार उडवली. पेरणीचीं कामें चालू आहेत.

मडोच— पाऊस बराच झाला. पेरण्या सुरू आहेत.

नवसरी— पाऊस खूपच झाला पेरण्या चालू आहेत.

रत्नागिरी— सपाटून पर्जन्यवृष्टी झाली.

दगडांचा पाऊस— बैगनिया ( मुजफरपूर ) येथें दगडांची वृष्टि होऊन पुष्कळ माणसें व पशू मरण पावले.

खबुतराच्या साह्यानें लेखी निरोप पोंचविण्याचें काम जर्मनींत चालू आहे. २०० खबुतरें तैनातीस आहेत.

चीनांतील कांहीं भागांत दुष्काळ पडला तेथें मनुष्यें एकमेकांस खात आहेत. चीनी लोक सर्व भक्षकच!

जमिनींत गडप झालें— चितागंग जिल्ह्यांतील शियारतगंज येथील पोस्ट आफिस जशाचे तसेंच सामान, तिजोरी, पेट्या वगैरे सुद्धां सगळें जमिनीत गडप्प झालें. त्या वेळीं पोस्टांत कोणी माणसें नव्हतीं असें ह्मणतात. कित्येक ठिकाणीं जामिनीला भेगा पडल्या असून त्यांतून पाण्याचें प्रवाह सुरू झाले आहेत, पण मोहरम असल्यामुळें घरांत माणसें नव्हतीं.

बरेली येथें हिंदू मुसलमानांनीं आपसांत आपली एकी केली. त्यांत बकऱ्या शिवाय कोणत्याही जनावराचा वध करावयाचा नाहीं असें मुसलमानांनीं ठरवलें आहे.

पंजाब इलाख्यांत सुमारें दोन लक्ष गुरें चारा न मिळाल्यामुळें तडफडून मेलीं असें कर्नल मॉंटगोमरी यांनीं बाहेर आणलें आहे.

काबुलच्या अमिराच्या हत्तीखान्यावर वीज पडून २ हत्ती व महात मेले असें कळतें.

पोरबंदर येथील नवें बांधलेलें तळें फुटून ८ मनुष्यें मरण पावलीं व २ जखमी झालीं.

आ० व०

स्वदेशी होल्डर—राजापूर तालुक्यांतील डोंगर येथील रहिवासी रा. रा. गोविंद भास्कार रानडे वैद्य यांणीं टांक घालण्याचे होल्डर बिलायती नमुन्यावर तयार केले असून त्यांपैकीं कांहीं आमचेकडे पाठविले आहेत. त्यांची किंमत माफक ह्मणजे प्रत्येकास एक पैसाच आहे. ते आमचे आफिसांत पाहण्यास मिळतील. रा. रानडे यांचा प्रयत्न लोकाश्रयास पात्र आहे; टांक तयार करण्याचाही ह्यांचा प्रयत्न चालला आहे. हे होल्डर दुकानदारांनीं विकरीस ठेवल्यास ह्या देशी मालास उत्तेजन दिल्यासारखें होईल.

धारवाड जिल्ह्यांतील गदग तालुक्यांत डबळ येथें सडकून पाऊस पडून तेथील तलाव फुटला आणि त्याचें पाणी गांवांत येऊन घरांतून शिरलें. विशेष नुकसान झालें नाहीं. रोण येथें एका शिंप्याचे घरांत पाणी शिरून घर पडलें. आणि त्या खालीं ३ मनुष्यें सांपडून मेलीं.

ह्मैसूर पार्लमेंटावर गदा— ह्मैसुरच्या कै. महाराजांच्या कारकीर्दीत त्रैलोक्यभर गाजलेली तेथील लोकप्रतिनिधींची जी नमुनेदार पार्लमेंट सभा, ती हाणून पाडण्याचे प्रयत्न सर शेषाद्रि अय्यर यांणीं अलिकडे चालविले आहेत; त्या सभेला अर्ज करण्याचाही अधिकार नाहीं, ह्मणून सागण्यांत येत असून सभेचीं प्रोसिडिंगें सरकाराकडे पाठवावयाचीं, तीं सुद्धां पाठवीत नाहीं असे जबाब मिळत असल्याचें ह्मैसूर हेरल्ड पत्रात लिहिलें आहे.

न्या० सु०

निझामाचा सेक्रेटरी मि. हारमसजी यास चाकरींतून काढून टाकलें व हद्दींतून निघून जाण्याचा हुकूम झाला. आपल्यास काढण्यांत अन्याय होत आहे असें वकिलामार्फत निझामास कळविण्याचा हार्मसजीचा विचार होता. पण ऐकून घेण्याचें निझामानें नाकारलें व एकदम हद्दींतून निघून जाण्याचा हुकूम झाला त्या प्रमाणें ते, मोंगलाई अधिकाराचा प्रयोग आपल्यावर होऊं नये ह्मणून एकदम सिकंदराबादेस आले व तेथून मुंबईकडे निघून गेले. मि. हामसेजी जातात असें ऐकून वाईट हेतूनें पुष्कळ लोक हैदराबाद स्टेशनावर जमा झाले होते. आतां राय हुकुमचंद हे त्यांच्या जागीं सेक्रेटरी होतील. मुख्य उन्हाळा प्रधान सर विकार यांचींही उचलबांगडी होऊन सर अस्मान जा हे प्रधान होतील असा अदमास आहे.

क्रीट बेटात खिस्ती व मुसलमान यांच्यांत अजून लहान सहान चकमका झडतच आहेत.

लढाईच्या खर्चाची रकम टर्कीनें ग्रीसजवळ ४० लाखापेक्षां जास्त मागूं नये असें टर्कीच्या दरबारच्या बड्या राजांच्या वकिलाचें ह्मणणें आहे.

टोचीव्हाली लोकांवर जावयाची स्वारी तयार झाली व कांहीं लोक तिकडच्या बाजूस जाऊंही लागले,

लाहोर शहरांत पटकीचा वाखा चालूं झाला आहे.

मध्यप्रांतांत चाऱ्याच्या तोट्यामुळें गुरें फार मरत आहेत.

काबूलचा अमीर आपल्या वेगळाल्या प्रांतांकरतां वेगळाल्या रंगाचीं पोष्टाचीं टिकिटें करीत आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........०१ ०६
दुसरे खेपेस ..........०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8
Single copy .................. 4

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 19 JULY 1897 NO 28

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १९ माहे जुलई सन १८९७ इ० अंक २८


नोटीस

रा. रा. मारुती टीकराम हलवाई राहणार बदनापूर तालुके औरंगाबाद यासः—

नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास मुखत्यारपत्राचा कागद करून दिला होता पण तुह्मी अधिकारा बाहेर वागला. लबाडी व विश्वासघाताच्या गोष्टी केल्याचें कळतें. तुह्मी आपल्या सर्व कामगीरीचा हिशोब ८ आगष्ट १८९७ इसवी पूर्वी खामगांव मुक्कामी येऊन द्यावा. तुमचा मुखत्यारनामा आह्मी पूर्वीच रद्द केला आहे. सदर्हू तारखेच्या आंत तुह्मी खात्री करून दिली नाहीं तर तुमचा जबाब योग्य कोर्टात घेतला जाईल. कळावें तारीख १३।७।९७

सही

सुंदराबाई जवजे त्रिंबक हलवाई राहणार खामगांव इच्या हातची निशाणी तुळशीची माळ

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मारुती टीकाराम हलवाई याचा कूलमुखत्यारनामा पुष्कळ दिवसा पूर्वींच मी काढून घेतला आहे. तर त्याच्याशी माझ्या इस्टेटी संबंधानें कोणी व्यवहार केल्यास किंवा पुढें करण्यांत आल्यास त्याची सर्व जबाबदारी ज्याची त्याच्या शिरावर राहील. कळावें.

ता. १३।७।९७ इसवी.

सही

सुंदराबाई जवजे त्रिंबक हलवाई राहणार खामगांव इच्या हातची निशाणी तुळशीची माळ

---

नोटीस

रा. रा. शामराव नारायण देशमुख अज्ञानपालन करणार आई कौतिकाबाई जवजे नारायणराव तर्फे कुलमुख्त्यार खुशाल गणपतराव देशमुख राहणार अंदुरा तालुके बाळापूर यांस—

या लेखानें कळविण्यांत येतें कीं तारीख १२।७।९७ रोजीं तुमचेवर अत्री मलकापूर तर्फेच्या रुसुमा बद्दल चाललेल्या दाव्यांत हुकुमनामा झाला आहे. त्या दाव्यांतील रुसुमाचा पैसा कायदेशीर रीतीनें वसूल केला जाईल. तुह्माकडूनच अत्री तर्फेचा माझ्या हिशाचा पैसा मला मिळावा असा ठराव झाला आहे ह्मणून ही नोटीस देतों कीं, चालूं सालचा रुसुमाचा पैसा माझ्या खर्चानें मनीआरडर करून माझ्या घरीं पोचतां करावा. तसें वर्तन न घडल्यास तुह्मावर निराळी फिर्याद करून सर्व पैसा वसूल केला जाईल. त्या शिवाय तुह्मास दरमहा दरशेकडा २ रुपये व्याज द्यावें लागेल. या नोटिशीचा खर्चही तुह्मावर पडेल. कळावें तारीख १४. जुलै सन १८९७ इ०

( सही )

रुस्तुमराव भास्करराव देशमुख राहणार अत्री मलकापूर तालुके बाळापूर दस्तुर खुद्द.

---

नोटीस

रा० रा० रामु वल्लद माहादु रंधवे बारी हल्लीं राहणार मौजे कुऱ्हे प० ता० जि० भुसावळ यांस खाली सही करणार इजकडून नोटीस देण्याचे कारण असे कीं तूं माझा गंधर्वीचा नवरा आसोन आज सात वर्षे झालें तूं मजला टाकून दिलें असोन सुमारे साहा वर्षा पूर्वींच मजला दुसरा नवरा करण्यास परवानगी मौजे तळनी तालुके मलकापूर येथील राहणार इसम नामे देसाई चवकीदार व सावजी व पुंजाजी कोळी व माझा बाप नामे माहादुबारी असे इसमा समक्ष माझे अंगावरील डागीने पायांतील कडे जोड १, हातातील दंडवाळ्याचा जोड १, पाटल्याचा जोड १, सरी १, पोवळ कड्याचा जोड १, सर्व चांदीचे व सोन्याची गरसोळी किंमत रुपये २० ची असे सर्व डागिने छिनून घेऊन डागिने पावले बद्दल पवती ही माझे बापाजवळ कायम आहे. आणखी तूं मजला फारकतीही दुसरा नवरा करण्या करितां करून दिली. हल्लीं ती फारकती माझे जवळ आसलेली गाहाळ झाली आहे या मुळें मजला दुसरा नवरा करण्यांस आडचण पडली आहे आणि मी असे ही ऐकत आहे कीं तूं माझेवर या पुढें दुसरा नवरा करीन तर फिर्याद ही करणार आहेस सबब तुजला ही नोटीस देऊन कळवितें कीं नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत दुसरी फारकत लिहून पाठवून द्यावी आगर फारकती देणे नसेल यास मी लोकांचे घरीं आज पर्यंत राहून खाल्लेले कर्ज रकम रुपये १५० एकसे पन्नास रुपये व शिवाय माझे आंगावरील नेलेले डागिणे परत आणून द्यावेंत. असें जर करणार नाहींस तर मी दिलेली नोटिसीची मुदत पुरी झाले बरोबर दुसरा गंधर्वीचा नवरा करीन. ही सर्व हकीकत तुझे गावांतील पाटील याचा गुमास्ता लक्ष्मण बारी पंच यांस ही माहीत आहे. दिलेले मुदतींत फारकत पाठवून द्यावी अगर डागीनें व कर्ज खाल्लेले रुपये पाठवून मजला घेऊन जावें कारण साल दुष्काळाचे आसोन हल्लीं मजला कोणी वागवीत ही नसोन मजला खाण्यास भाकर ही मिळत नाहीं सबब तुजला कळविलें आहे. मात्र या पुढें तुझे कोणतेंच कारण न ऐकतां दिलेले मुदती नंमर दुसरे गंधर्वाचा नवरा करीन. या नोटिशीचा खर्च तुजवर असे ही नोटीस दिली सही तारीख १३ जुलै सन १८९७ इ०

( सही )

नथी मर्द रामु बारी हल्लीं राहणार मौजे तांदळी खुर्द प्रगणे पातूर तालुके बाळापूर जिल्हे अकोलें निशाणी हातची खुद्द बांगडी असे. ( ० )

---

I travell'd among unknown men
In lands beyond the sea;
Nor, England ! did I know till then
What love I bore to thee.

'Tis past, that melancholy dream !
Nor will I quit thy shore
A second time, for still I seem
To love thee more and more.

Among thy mountains did I feel
The joy of my desire;
And she I cherish'd turn'd her wheel
Beside an English fire.

Thy mornings show'd, thy nights conceal'd
The bowers where Lucy play'd;
And thine too is the last green field
That Lucy's eyes survey'd.

W. Wordsworth.

साकी

मायद्वीपा सोडूनि फिरलों परकीयांच्या देशीं ।
त्वाद्विषयक मज ठाऊक नव्हती प्रीती तोंवारि कैसी ॥
इंग्लंदा ! ममदेशा ! भजतों तुज सर्वेशा ॥१॥

व्यामोहाचि तो दुःखद गेला ! पुनरपि या तीराला ।
सोडुनि तुझिया जाणें नाहीं; संशय सर्वं हि फिटला ॥
प्रेमभरें मन हें । अद्यापि न विरहा साहे ॥२॥

आनंदे मन भरतें तुझिया पर्वत वृंदीं फिरतां ।
सोज्वळ अनला समीप ललना कशिदा काढित बसतां ॥
इंग्लंदा ! ममदेशा ! । भजतों तुज सर्वेशा ! ॥३॥

उषःकाल तव दावी मित्रा ! रजनी झाकुनि टाकी ।
लता कुंज मम दायितेचा ती खेळे जेथें तो कीं ॥
स्मृति शेषा ती ललना । शेवटिं तव देखे राना ॥४॥

---

## स्त्रीशिक्षणावर चार शद्ब.

नेपोलियन बोनापार्ट यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, "राष्ट्रोन्नति करायची असेल तर अगोदर आयांची उन्नति केली पाहिजे" कारण त्या राष्ट्रोन्नतीचे प्रधान साधन आहेत व आयांची उन्नति करण्यास त्यांना सुशिक्षण देणें हें अवश्य आहे. पाश्चात्य ग्रंथकार कार्लाईल असें ह्मणतो कीं, "स्त्रियांना किंवा पुरुषांना सुशिक्षण न देणें ह्मणजे त्यांना हस्तपायादि इंद्रियां विरहित करणें होय. ज्या प्रमाणें अंध मनुष्याला सृष्टीसौंदर्य दृग्गोचर होत नाहीं, त्याच प्रमाणें अशिक्षित लोकांना ज्ञानसंपादना पासून होणारे फायदे समजत नाहींत. हा आपला देश विद्येच्या संबंधानें कोणत्याच राष्ट्राला हार गेला नाहीं. व पुढेंहि कचितच जाण्याचा संभव आहे. अलिकडेस मात्र पाश्चात्य राष्ट्राशीं तोलून पाहतां हा आमचा देश विद्येचे संबंधानें मागसला आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतिल कोळी, माळी, तांबोळी, गाडी हाकणारे सर्व लोकांस लिहिता वांचतां येते. व या मुळें ते राज्यप्रकरणाच्या गोष्टींत देखील उलाढाली करूं शकतात. असा सुदीन आमच्या देशांत कधीं येईल कांहीं समजत नाहीं.

लिहिण्याला मोठा खेद वाटतो कीं, आमचे पैकीं निम्मा भाग ह्मणजे स्त्रीजाती पूर्णपणें अज्ञानांधकारांत गटांगळ्या खात आहे.त

प्राचीनकाळीं पुरुषांप्रमाणें स्त्रिया देखील सुशिक्षित असून, आपल्या पतींना संसारांत हरएक गोष्टींत मदत करीत होत्या. त्या आपले नवऱ्यांबरोबर समाजात जात होत्या. हें प्राचीन एतद्देशीय इतिहासावलोकनावरून चांगलें अवगत होतें. अलिकडेचस मात्र स्त्रियांस पुरुषांप्रमाणें लिहिण्या वाचण्यास शिकविणें पाप मानूं लागले.

पुष्कळ लोकांचें या स्त्रीशिक्षणा संबंधानें असें ह्मणणें आहे कीं; स्त्रियांस शिक्षण दिलें व या विद्येंत चांगल्या प्रसार झाल्या ह्मणजे पुरुषांप्रमाणें नौकऱ्यादि इतर धंदे करूं लागतील; मग घरची प्रापंचाचीं कामें कोणी करावींत. पाकनिष्पत्ति, दळण कांडण, मुलाबाळांची खाण्यापिण्याची व्यवस्था पुरुषांनीं ठेवावी कीं काय? स्त्रियांना लिहिण्या वाचण्यास शिकवून हुशार केल्यास त्यांना त्यांचे ईश्वरनिर्मित हक्क पूर्णपणें समजतील; व मग त्या आह्मांला आपले हक्क मागतील. आमचा विचार तर त्यांना स्वेच्छेवर अवलंबून ठेवण्याचा आहे.

कोणी ह्मणतात स्त्रियांना लिहिण्या वाचण्यास शिकविल्यास त्या विभत्स रसानें ओतप्रोत भरलेलीं नाटकें, कादंबऱ्या, चावट लावण्याचीं बुकें वाचून नीतिभ्रष्ट होतील; कोणी ह्मणतात स्त्रिया जात्याच नाजूक असल्यामुळें त्यांचेवर जर शिक्षणाचा ( मानसिक शिक्षण श्रमाचा ) बोजा लादल्यास त्यांची शारीरसंपत्ति बिघडण्याचा विशेष संभव आहे. कोणी ह्मणतात; स्त्रिया जर आपले बरोबरीच्या हुशार झाल्यातर त्यांच्यावर आपलें फाजील वर्चस्व चालणार नाहीं. त्या बरोबरीला येतील.

ह्या त्यांचे ह्मणण्यांत कांहीं तथ्य आहे असें आह्माला वाटत नाहीं. हें त्यांचें ह्मणणें केवळ स्वार्थाकरितां आहे. हें निःपक्षपाती मनुष्यास कबूल करावें लागेल.

बीभत्स रसानें पूर्ण भरलेल्या कादंबऱ्या, नाटकें, चावट लावण्याचीं बुकें वांचल्याचे योगानें पुरुषांचे नीतीवर दुष्परिणाम घडत नाहींत काय? घडतात हें तर कबूल केलें पाहिजे. तर मग आपण पुरुषांना लिहिण्या वांचण्यास शिकवूं नये असा कायदा कोठें केला आहे? पुरुषांचेच संबंधानें जर असा कायदा करणें इष्ट दिसत नाहीं तर, आमच्या अबला अशीं पुस्तकें वांचून अनीतीचीं घरें बनतील असा अयोग्य, विचारशून्यतेचा आरोप त्यांचेवर ठेवून त्यांना शिक्षण देण्यास प्रतिबंध करणें यांत कांहीं तथ्य आहे काय?

स्त्रिया जात्याच नाजूक; त्यांचेवर मानसिक श्रमाचा बोजा लादल्यास त्यांची शरीर प्रकृति बिघडेल या संबंधानें पुष्कळ डाक्तर लोकांनीं शोध करून पाहतां त्यांची पक्की खात्री कीं तसा कांहीं एक प्रकार नाहीं. व तसा कांहीं प्रकार नसावा हें आपणांस पाश्चात्य देशीय स्त्रियांच्या गोष्टी एकून समजतें. कोणी ह्मणतात स्त्रियां विद्येंत पारंगत झाल्या तर त्या पुरुषांचा उपमर्द करतील; पुरुषांबरोबर तर्कट वाद करून संसाराचें मातेरें करून घेतील.

स्त्रियांना जर विद्यामृताचा अलभ्य लाभ करून दिला तर त्या जगांत आपलें उत्तम प्रकारचे मित्र बनतील. भवसागरांत वेळोंवेळीं उत्पन्न होणाऱ्या संकटांत आपणांस कामीं पडतील. दुःखविमोचना करितां चांगला सल्ला देतील. व दुसरे बाहेरील मित्रांचा सल्ला क्षुल्लक गोष्टींत विचारण्याचा प्रसंग क्वचितच येईल. स्त्रिया जात्या नम्र तशांत त्यांना विद्यारूपी अमृत पाजिलें तर त्यांचीं मतें फार खोल होऊन त्या विनयाची प्रतिमाच बनतील. त्यांना शिक्षण मात्र अश्या प्रकारचें मिळालें पाहिजे, त्यां चांगल्या गृहिणी होतील. त्यांना नुसतें लिहितां वांचतांच आलें ह्मणजे आपले समाजावर त्यांचे लिहिण्या वाचण्याचे उत्तम परिणाम घडून समाजोन्नती होईल. त्यांना शिकविण्यासारख्या दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत.

मुलें शाहाणीं निपजण्यास मुख्य त्यांच्या आया शाहाण्या पाहिजेत व डाक्टर लोकांचें असें अनुभवास आलें आहे कीं; आईचे सुशिक्षणाचे परिणाम तिचे गर्भांभर घडतात. कोणी असा आक्षेप घेतील कीं या आपले आर्यावर्तावर जितकीं कांहीं पुरुषरत्नें चमकलीं त्यांच्या माता सर्व शाहाण्याच होत्या कीं काय? ज्यांच्या आया शहाण्या नसतील तर त्यांचेवर त्यांचे बापाचे शहाणपणाचा परिणाम घडला असेल. व बाप शहाणा असून आईही पण शहाणी असली तर मग अधिकाचें अधिक फळ असें होईलें. सद्गुणी व शहाण्या मातांची संतति कधींही नांवालौकिकास चढल्यावांचून राहात नाहीं. व या संबंधानें प्राच्य आणि पाश्चात्य देशांचे प्राचीन इतिहास वाचल्यास बरींच उदाहरणें दृष्टीगोचर होतात.

स्त्रिया निसर्गतः कोमल अंतःकरणाच्या असल्यामुळें कुटुंबास कोणाला दुखणें बाहणें आल्यास, रोग्यांची जेवण खाण्याची, औषध पाण्याची, व्यवस्था ठेवण्यास पुरुषापेक्षां फार उपयोगीं पडतात. तशांत जर त्यांना लिहितांवांचतां येऊन इतर चांगली माहिती त्यांना असल्यास त्यांचेपासून किती फायदा होईल बरें.

पुरुषांना ज्याप्रमाणें सामाजिक हक्क आहेत त्याप्रमाणें स्त्रियांनाही आहेत; हें तर निर्विवादच आहे. आपल्याला आपले हक्क समाजाकडून मिळाले नाहींत ह्मणजे आपल्या आंगचा जसा तिळपापड होतो, पायाची आग मस्तकास चढते तसें त्यांना होत नसेल काय? आपणाला जसे आपले विद्यमान गौरकाय ऐहिक प्रभूंनीं विद्यारूपीं अमृत पाजून शहाणें केलें, आपले हक्क सरकारापाशीं कसें मागावे हें शिकविलें व त्यांचा विनियोग कसा करावा हें दाखविलें; त्याचप्रमाणें आपण आपल्या स्त्रियांना, आयांना, भागिनींना शाहाण्या करून त्यांचे हक्क समाजाकडून मागून त्यांचा योग्यप्रकारें विनियोग करणाऱ्यांना असें केलें पाहिजे. यांतच खरें आपलें मनुष्यत्व व कर्तव्य आहे. त्या तर जाणून बुजून अबलाच. शिवाय स्त्रियांना जगनियंत्यानें दिलेले हक्क आपणास हिरावून घेण्याचा काय अधिकार आहे? जर आपणाला कोणताच अधिकार नाहीं तर आपण स्वार्थाकरितां, जुलमानें त्यांचे हक्क हिरावून घेतो हा एक आपण मोठा गुन्हा कारितों असें नाहीं कां झालें? गुन्हा झालाच तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे.

सारांश हाच कीं राष्ट्रोन्नति करायची जर तुमची मनापासून इच्छा असेल, व आपलें राष्ट्र जें सध्यां निच्याव्यवस्थेप्रत पोहोंचलें आहे त्यास उच्च पदास न्यावयाचें असल्यास, व दुसऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांबरोबर टक्कर मारायची असल्यास आपणांत हल्लीं आहे त्याचेपेक्षां शतपटीनें जास्ती पुरुष व स्त्री या दोन्ही वर्गांत विद्येचा प्रसार झाला पाहिजे.

मोर्शी, दे०

७।६।९६

---

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ९ शके १८१९

---

नोंदणी खात्याच्या सन १८९६-९७ च्या रिपोर्टाचा एक प्रत आलिशान रेसिडेन्ट साहेबा कडून आह्माकडे मामूल वहिवाटी प्रमाणें आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितो. या वार्षिक रिपोर्टांतील कांहीं गोष्टी मोठ्या चिंतनीय आहेत. गेल्या वर्षाच्या दुष्काळानें सर्व प्रांत हालवून सोडला तेव्हांच साधारण अनुमान असें वाटलें होतें कीं मध्यम स्थितीचे लोक आपल्या जवळील इस्टेटीला आंचवतील आणि नोंदणी खात्याचें काम त्या मानानें बरेंच वाढेल, हल्लीं रिपोर्टांत प्रसिद्ध झालेले आंकडे वरील तर्क सप्रमाण खरा करून दाखवितात. या प्रांतांत ६ जिल्हा-राजिष्ट्रार व ६२ सब-राजिस्ट्रार मिळून ६८ नोंदणीच्या कचेऱ्या आहेत. वणी जिल्ह्यांतील बोरी येथें सबराजिस्ट्रारची कचेरी होती. तेथें नोंदणाचें काम ह्मणण्यासारखें नव्हतें ह्मणून ती कचेरी अनावश्यक वाटल्यावरून गेल्या फेब्रुवारी महिन्या पासून बंद करण्यांत आली. वाशिम जिल्ह्यांत दोन नवीन नोंदणीचीं आफिसें स्थापन करण्या विषयीं वरिष्ठ सरकारची मंजुरात मिळाली. पहिलें आफिस जऊळकें गांवीं असून दुसरें मनोरा या गांवीं आहे.

या प्रांतांत नोंदणी खातें स्थापित होऊन २६ वर्षे झालीं. या एवढ्या कालांत गतवर्षीं प्रमाणें नोंदणीचें वाढलेलें काम कधींच दृष्टीस पडलें नाहीं. सन १८९३ सालीं नोंदलेल्या दस्ताऐवजांचा आंकडा फार मोठा ह्मणजे ३५१८३ होता तो यंदा ३६५०७ झाला आहे. पूर्वी पेक्षां देवघेवी, व्यापार इत्यादि पुष्कळ वाढले आहेत आणि त्य मानानें नोंदणीचें कामही वाढलें आहे तथापि यंदाच्या रिपोर्टांत नोंदण्यास आलेल्या दस्ताऐवजांचा आंकडा मागील सर्व वर्षांपेक्षां फार मोठा आहे याला कारण दुष्काळाचा तडाखा होय. स्थावर इस्टेटी संबंधानें ३४६६६ दस्ताऐवज झाले आणि त्यांत समाविष्ट झालेल्या इस्टेटीची अंदाजा किंमत रु० १०६०१८८८-१ आ.-८ पै आहे. या दस्ताऐवजांच्या स्वरूपामध्यें एक विलक्षण गोष्ट नजरेस येते. सावकार लोक कुळांशीं गहाण वगैरे भानगडीचे व्यवहार फारसे ठेवीत नाहींतसे झाले आहेत. सर्व भर खरेदीखतांवर आहे हें ध्यानांत येण्या साठीं खाली आंकडे फार महत्वाचे आहेतः—

सन १८९५-९६ सालीं विक्रीखता पैकीं १०० रुपया वरील किंमतीचीं १०९४० असून त्यांतील इस्टेटीची किंमत रुपये ४०३९०९७-१२-६ पै होती; आणि १०० रुपयां खालील किंमतीचीं विक्रीखतें ३११९ असून त्यांतील नोंदलेली इस्टेट रुपये १,६६,१०२,-१०-६ पै किंमतीची होती. गहाणखताचे १०० रुपयावरील पूर्जे १०१४५ त्यांतील इस्टेटीची किंमत रुपये ४३९९७९३-१२-६ पै होती आणि १०० रुपया खालील पूर्जे १७४३ असून इस्टेटीची किंमत रु. १०६५५६-२-१० पै होती. सन १८९६-९७ खालीं विक्रीखता पैकीं १०० रुपयां वरील किंमतीचीं ३१३७५ असून त्यांतील इस्टेट ४३,०७,०८२-२-१ पै किंमतीची आहे, १०० रुपया खालील किंमतीचीं खरिदीखतें २९३० असून रुपये १५५२४६-५-३ पै किंमतीची इस्टेट आहे. गहाणाचे १०० रुपयां वरील पूर्जे १०४७४ असून त्यांची गोळाबेरजेची किंमत रुपये ४८८४२३-१२-० पै आहे. आणि १०० रुपया खालील गहाणखतें १८१८ असून त्यांची किंमत ११००९३-५-६ पै आहे. सारांश असा कीं १०० रुपया वरील किंमतीचीं गहाणखतें थोडीं अधिक आहेत तथापि इस्टेटीची किंमत पुष्कळ कमी आहे. पण १०० रुपया खालील गहाणखतें वाढलीं असून इस्टेटीची किंमतही अधीक आहे. विक्रीखतामध्यें १०० रुपयावरील विक्रीखतें पुष्कळ वाढलीं असून त्यांत येणाऱ्या इस्टेटीची किंमतहि ३ लक्ष रुपयांनीं वाढली आहे. अलिकडे आमचें मत असें होत चाललें आहे कीं सावकार लोक कूळांस खरिदीखता शिवाय कर्ज वगैरे देत नाहींत. कूळाजवळ ऐपत नाहींशी झाली आहे आणि त्यामुळें त्यांची सावकारापाशीं पूर्वी प्रमाणें पत राहिली नाहीं. आणि दुष्काळा सारख्या ईश्वरी कोपामुळें ही शोचनीय स्थिती फार स्थूलमानानें दिसून येत आहे. सांप्रतची स्थिती दूर करण्याला उपाय सूचले नाहींत तथापि तिचें अस्तित्व ओळखून ठेवणें अगदीं जरूरीचें आहे. डोळ्यावर भ्रमपटल राहूं देतां कामा नये. प्रजासमूहाची गृहस्थिती समाधानकारक नाहीं आणि या दरिद्रीपणाचे वर्तुलांत फिरतां फिरतां त्यांची काय दशा होईल याचें अनुमान देखील कल्पनेच्या बाहेरचें आहे.

नोंदणी खात्याचे १८९६-९७ सालीं उत्पन्न रुपये ९०४७२-११-६ पै झालें आणि त्या पैकीं खर्च वजा जातां बाकी निव्वळ नफा रुपये ३९९६० ११ आ. ७ पै झाला आहे. गेल्या २५ वर्षांची निवळ शिल्लक रुपये ४,८१,१९९-० आ.-९ पै आहे. एकंदरींनें आज पर्यंत या खात्या पासून सरकारला रुपये ५,२१,११९-१२-४ पै इतका फायदा झाला आहे.

नोंदणी खात्यांत एक महत्वाची सुधारणा अमलांत येत आहे. ही सुधारणा ह्मणजे ज्यांस लिहितां वांचतां येत नाहीं त्यांच्या सहीचा निशाणी न घेतां त्यांची अंगुठमुद्रा नोंदण्याच्या कागदावर उमटवून घेण्यांत येईल. हाताच्या अंगठ्यावरील खुणा कायम राहतात व त्यांची आकृती बदलत नाहीं. आणि त्याचा ठसा कितीही वर्षांनीं घेतला तरी पूर्वींचा ठसा व नवीन ठसा या मध्यें समत्व निर्णीत करण्या इतका सारखेपणा राहतो. जर कोणी लेखनानभिज्ञ एखादा पूर्जा नोंदून दिल्या नंतर मागाहून ती गोष्ट नाकबूल जाईल तर नोंदते वेळीं कागदावर घेतलेली अंगुष्ठमुद्रा जुळवून पाहिल्या नंतर सारखेपणा वरून दस्तोऐवज नोंदून देणारा व त्या गोष्टीस नाकबूल जाणारा यांची एकरूपता सहजी शाबित करिता येईल. त्याच प्रमाणें कित्येक उदाहरणें अशीं घडतात कीं नोंदणी अंमलदारा समोर निराळाच मनुष्य उभा करून करून लबाडीनें त्याच्या तोंडून निराळ्याच मनुष्याच्या नांवानें करून घेतलेला कागद नोंदून घेण्यांत येतो. या अंगुष्ठमुद्रणाच्या योजनेनें अशा लबाड्या तत्काळ उघडकीस येतील. ज्या प्रांतांत लेखनकला ठाऊक नसलेले लोक पुष्कळ आहेत तेथें अशा लोकांनीं लबाडी करूं नये किंवा अशा लोकांशीं इतरांस लबाडी करण्यास संधी मिळू नये ह्मणून सहीच्या निशाणीच्या ऐवजी अंगुष्टचिन्ह नोंदावयाच्या कागदावर घेण्याची सुधारणा फार महत्वाची आहे.

---

औद्योगिक शिक्षणाचा प्रसार इंडियांत अद्याप नाहीं. हें शिक्षण इंडियन लोकांस मिळालें नाहीं तर या देशाची स्थिती सध्यां पेक्षां अधिक वाईट होईल. युरोप खंडांतील राष्ट्रें या देशाला सर्व चीजवस्तु पुरवितात. परराष्ट्रीय मालानें हा देश इतका ओ

तओंत भरला आहे कीं या देशच्या मालाचें त्या मालापुढें कांहीं तेज पडत नाहीं आणि त्या कारणानें देशी माल तयार होण्याचे कारखाने उत्तरोत्तर ऱ्हास पावत आहेत. आणि अलिकडील विद्यामृतानें औद्योगिक व्यवसायाला आमचे शिकलेले लोक पराङ्मुख होत आहेत. आमच्या लोकांची घरें दारें विलायती वस्तूंनीं चकाकत आहेत. देशी वस्तू फार थोड्या आढळतील. लहान सामानांत देखील हीच व्यवस्था आहे. सध्यां जी स्थिती प्राप्त झाली आहे तिचा अर्थ असा कीं आह्मी जन्मलों या देशांत, आह्मी राहतो या देशांत, पण आह्मी जगतो मात्र विलायती वस्तूवर. आमच्या खाण्यापिण्याचे पदार्थ देशी असतात पण त्यांत देखील कालमानानें विलायती पदार्थांनीं प्रवेश केला आहे. आमच्या लोकांस धंदा शेतीचा उरला आहे. या धंद्यावर जी कांहीं करामत होईल ती खरी. शेतीवर शेकडा ९० या प्रमाणानें ३० कोटी प्रजा खपूं लागल्यावर आमच्या लोकांस पुरेसा उद्योग मिळणार नाहीं हें उघड आहे. पूर्वीचें हस्तकौशल्य ऱ्हास पावलें, यांत्रिक ज्ञाना संबंधानें आह्मी जन्मांधा सारखे आहो, आणि ही अवस्था दूर करण्याची विद्या आह्मास ठाऊक नाहीं. आमच्या देशांतून बाह्य देशीं कोट्यावधी रुपयांचा कच्चा माल जातो ही गोष्ट दुसऱ्या देशाच्या साम्पत्तिक वैभवाकडे बोट दाखविते. इंडिया सारख्या खंडांतला माल परराष्ट्रांत जातो ह्मणजे परराष्ट्रीयांस इतक्या प्रचंड मालावर कारागिरी व कौशल्य खर्चण्यास उद्योगसामुग्री मिळते, त्यांचा चरितार्थ चालतो, त्यांच्या यांत्रिक हत्तीला स्वैर फिरण्यास पुष्कळ वाटा मिळतात आणि सर्व बाजूंनीं त्यांच्या देशांत श्रमाचें चिज होऊन संपत्तीचे प्रवाह सततपणें चालतात. इंडिया देशावर युरोपचीं राष्ट्रें सांपत्तिक स्थितींत चांगलीं सांवरलीं आणि आमचा देश व्युत्क्रम दिशेनें ऱ्हासास पोचत चालला आहे.

वरील स्थिती आह्मांस दुःखद असो, किंवा परराष्ट्रीयांस सुखद असो, ती नाकबूल करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही स्थिती पालटण्याला एकच उपाय आहे. आपल्या देशच्या गरजा विलायती मालानें भागविण्याची बंदी केली पाहिजे. ही गोष्ट कदाचित् या राष्ट्राच्या चालू चक्रांत प्रत्यवाय आणण्यासारखी कष्टतर वाटेल. आह्मी किती परस्वाधीन आहो याची कल्पना येण्याला एक नामी युक्ती आहे. ती अशी कीं विलायती वस्तूंचा संचार किंवा स्पर्श नाहीं असा पदार्थ वापरावयाचा असा बेत करून क्षणभर वागण्याचा प्रयत्न करा ह्मणजे आपणांस तत्काल आढळेल कीं आमचें क्षणही बिलायती वस्तू शिवाय लोटणार नाहीं. देशी माल तयार होईल तो कसाही असला तरी तो अधीक प्रिय मानला पाहिजे आणि त्याचा स्वीकार देशाभिमानानें, गौरवानें, उन्नतबुद्धीनें केला पाहिजे देशी माल तयार होण्यास औद्योगिक शिक्षण पाहिजे आणि त्या शिक्षणाच्या शाळा आपल्या देशांत विद्यमान नाहींत ह्मटलें तरी चालेल. आह्मी निश्चळ राहिलों तरी तें आह्मास पुरेल पण आपलें सर्व चळवळन औद्योगिक शिक्षणप्रसाराच्या दिशेनें होत गेलें पाहिजे. सरकार परकीय असल्यामुळें या बाबदींत तटस्थ राहतें किंवा निदान त्यांच्या भरंवशावर बसून आमचा निभाव लागण्याची आशा नाहीं.

---

*पुण्याचे भयंकर खून राज्यकर्त्यांच्या विचारशक्तीच खून करितील असा रंग दिसतो. वर्तमान पत्रकर्त्यांची स्वतंत्रता काढून घ्यावी अशा विषयीं सरकारी खलबतें चालूं आहेत. या बिकट समयीं नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांनीं एका जाहिर सभेंत बोलून दाखविलें कीं पिनल कोडचीं कलमें राजद्रोहाची प्रेरणा करणाऱ्या वर्तमानपत्रकर्त्यांस शिक्षा देण्यास पुष्कळ मजबूत आहेत. नामदार बाळ गंगाधर टिळक हे लोकांच्या मनांत राजद्रोह उत्पन्न करितात अशा खोट्या सबबीवर त्यांच्या नामघोषानें आंग्लो-इंडियन पत्रांनीं गहजब उडविला आहे. पुनिटीव पोलीस पुण्यावर बसवून त्याचा खर्च पुणें मुनसिपालिटीकडून तगाद्यानें मागितला आहे अशी सर्वत्र राजद्रोहाची वावटळ आंग्लो-इंडियन पत्रकारांनीं उडविली आहे. प्रोफेसर गोखले यांनीं विलायतेंत पुण्याच्या प्लेग कमिटीचे प्रताप वर्णिले आणि दोन बायांची बेअब्रू सोल्जरांनीं कशी घेतली तें सांगितलें ह्मणून त्याबद्दल पुरावा न मिळण्याच्या भरवंशावर प्रोफेसर गोखले याजवर लार्ड सांडहर्स्ट व स्टेट सेक्रेटरी यांनीं त्रागा करण्याचा विचार चालविला आहे. जातो तो दिवस सोन्याचा!

---

*मुंबईच्या इंदु प्रकाशांत पुण्याच्या खूना संबंधानें खालील चमत्कारिक व विचारणीय गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत:—

(१) त्या जुबिलीच्या अंधाररात्रीं जाणाऱ्या लोकांची व गाड्यांची गर्दी असतां देखील त्या हमरस्त्यावर दिवे नव्हते.

(२) पोलीस पहारेकरी रस्त्यांनें नव्हते.

(३) त्या कृत्याच्या सुमारास एक युरोपिअन बायसायकल वरून जातांना दिसला.

(४) र्‍यांड साहेबांची तबेत प्रथम बरी होती तेव्हां जबानी घेतली नाहीं. पुढें ते बरळत होते.

(५) क्याप्टन लेव्हिसची जबानी कांहीं सर्वी देखत घेतली पण पुढें त्यांची, मिसेस हेअर्स्टची व र्‍यांडच्या गाडीवाल्याची जबानी गुप्तपणें घेतली.

(६) पोलिसची निराशा होण्या पूर्वींच २० हजारांचें बक्षीस लाविलें.

---

## The Berar Samachar

MONDAY JULY 19 1897

The formation of the Reception Committee of the 13th National Congress was formally over on the 11th instant. A general meeting was held at Amraoti but one had to regret the thin attendance of Congresswallas on that occasion. The present atmosphere is rather uncongenial to the growing progress of the work of the Congress. It has great disturbing elements at war. Famine, plague, earthquake, riot and tragedy have all combined to make the nation full of woe and misery. This predominent evil has crippled our energies. It has curtailed the subscribing powers of the people of the province. The first and foremost thought turns towards saving the lives of the famine—stricken. No other subject occupies our minds most when we have to pass daily through crowds of beggars for bread. We can hardly guess as to our next move in the discharge of the noble mission which the united voice of the Nation has entrusted us with. All the preliminary work of the National Congress has devolved upon the shoulders of the people of this province. Our leaders have to fight an uphill battle against so many odds. A prudent man will shrink at its enormous and onerous nature. But there is one saving element. It is the masterful of all ideals. The proud, bold and self-sacrificing patriotism is the the moter power in all our recent activities. The ideal before these public—spirited men is to make this year's Congress at Amraoti a complete and triumphant success. This long—cherished ideal subordinates and directs every impulse in the human heart to contribute to the success of the next Congress. The indifference of the present day will shortly be an unreal dream when the appreaching hour of the Congress will awaken us to the magnitude of the work and inspise within us a real life and an ennobling thought to serve our country well. We shall forget the disappointments in our path when we make ourselves doubly sure that success is not far distant from our programme. The National Congress is the most sacred institution of the country and it is no matter of pure talk if we say that our people shall rise to the grandeur of the work at the *magic* call of duty. We hope that our leaders shall bestir themselves in right earnestness and shall not let slip the golden *present*. It is further encouraging to note that, since the breaking of the monsoons though rather late, the agricultural prospect is a promising one.

---

The "Daily Chronicle"—London has a pertinent and eloquent observation on the policy which the Government of India should pursue in governending India. It runs as follows:—

"It was an Empire Parade, and one of which all the uncounted millions, whose peace and freedom is guarded by the English flag, may well be proud.

That Empire is, thank God, no mail-clad Cæsarism. Wherever the flag floats, the men who hold its power in trust are sworn to seek, if they do not always accomplish, the broadening of freedom, the spread of order, the reign of law, the march of progress. We have a hundred faults as makers of an Empire. We are insolent and masterful and aloof. We are counted unsympathetic and uncomprehending by all subject races. We are Philistines and Pharisees. So be it. All men have faults. But at least we have done what the world has never seen before We have built an Empire which stands by its own cohesion, and whose utmost bounds are tied together less by force than loyalty; an Empire where every man may look for equal laws, and where no crime against that law may hope to go unpunished an Empire by whose rule the subjec races gain far more than, at the highest reckoning, their conquerors have won.

Such an Empire will not fail. We are told that other empires have gone down. But how? The Persian was; rotten with every rottenness of which a Government is capable. Its conqueror did not live even to weld his conquests into a Cæsarism. Rome was the bloodsucker of the provinces, and her decrepitude was powerless against the vigorous children of the north—of whom we are. An Empire like our own has never yet been known. It has no precedent and no parallel. Unless we wreck it, it is not easy to see why it should fail.

There are two parts to which very different considerations apply. The bulk of its hundreds of millions of subjects are alien races whom we conquered. How can we hold them? Merely by the fact that by our rule they gain, and that in our rule they can be sure of justice. In so far as our Indian administration does *not* fulfil these canons, it is a danger. But the charter in which the principles of our Government in India stand declared binds us to fcrswear all tyranny, and as public opinion grows, the mischief which has come down to us from John Company will gradually pass away."

---

## वऱ्हाड

हवामान—पावसानें मोठी बहार करून दिली. पर्जन्य अगदीं वेळेवर आल्यामुळें मोत्याच्या वृष्टीप्रमाणें वाटत आहे. एकंदर पाणी चार इंचावर झालें असावें. पेरणीचीं कामें चागलीं सुरूं झालीं. हा पाऊस सर्व प्रांतभर झाला. किरकोळ पावसाळ्यांतली रोगराई विशेष वाढली आहे. या वर्षाकालांत दुष्काळग्रस्तांचा निभाव लागणें कठीण दिसतें. जवारीचा भाव १०० रुपये खंडी झाला आहे.

मि. एफ. एस. बुलक सिव्हिल सरव्हंट सी. आय. इ. कामिशनर यांची स्वारी गेल्या सोमवारीं अकोल्यास आली आणि शुक्रवारीं परत उमरावतीस गेली. साहेब बहादुरांस सी. आय. इ. हा किताब मिळाल्या नंतर हें पहिलें आगमन असल्यामुळें त्यांच्या अभिनंदनपूर्वक स्वागतासाठीं स्टेशनावर सरकारी व सुखवस्तु मंडळी पुष्कळ जमली होती.

मे. कामिशनर साहेबांनीं येथील कचेऱ्या, जिल्हाबोर्ड, मुनसिपालिटी इत्यादि संस्था विषयीं बारीक चौकशी केली. इंग्रजी आफिसचें काम त्यांस पसंत पडलें. जिल्हा बोर्डा विषयीं त्यांनीं अनेक वाटाघाटी केल्या आणि येथील शहरसफाई पाहून साहेब मजकूर फार खूष झाले.

पर्जन्य होत नव्हता ह्मणून ईश्वराची आराधना सार्वजानिक चालूं होत्या. आराधना यज्ञद्वारा, अभिषेकद्वारा व नामसप्ताहद्वारा सुरूं झाली होती. यज्ञाचें पुण्याहवाचन येथील पुण्यशील वेदमूर्ती रा. रा. नारायण जयराम घोंगे यांच्या हातून झालें आणि त्या कार्याला यशप्राप्तीहि लागलीच आली. लांड रिकार्डच्या कारकून मंडळींनीं अभिषेक फार नामी व व्यवस्थशीर केला. करुणेची भाक ईश्वरानें ऐकिली हें मोठें भाग्य होय.

उमरावतीस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेची स्वागत मंडळी नेमण्यांत येऊन चेअरमनचे जागीं रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे, बी. ए. एल्. एल्. बी. यांची नेमणूक झाली.

दर्यापूरचे तालुक्यांतील शिवर गांवचे प्रसिद्ध साधू पुरुष समाधिस्त झाले.

उमरावती जिल्हा बोर्डाचे सेक्रेटरी रा. रा. भास्कर सखाराम थत्ते यांस पुन्हा कामावर घेऊन डिपुटि कमिशनर कचेरींत क्लार्क नेमिलें.

---

## वर्तमानसार.

निझमाच्या राज्यांत पावसाचा थेंबही न पडल्यामुळें लोक घाबरले आहेत. माहागाई दुष्काळा सारखी झाली आहे. कालराही सुरू झाला आहे.

निझामाच्या राज्यांतल्या दुष्काळ कामदाराच्या रपोटावरून समजतें कीं, प्रांतांत दुष्काळ असूनही प्रांतांतले पुष्कळ धान्य बाह्यदेशी गेलें. एप्रिल–मे यांत ६,९१००० मण गेलें व मे— जून यांत ६,१९,००० मण गेलें. ह्मणजे सपटंबर पासून जूनपर्यंत एकंदर ३१,७१,०० मण गेलें. गेल्या वर्षाच्या याच मुदतींत याच्या निमे गेलें होतें. असें झालें तरी त्या भागांत आन धान्याचा तोटा नाहींच, मात्र भाव फार वाढला आहे असें सांगतात. औरंगाबादेच्या हद्दींत महागाई फार झाली आहे अशी तेथील कामदाराची ओरड आहे, पण पाऊस वेळेवर चांगला पडल्यास ही ओरड खोटी ठरून आबादी होईल असें दुष्काळ कामदार डनलाप याचें ह्मणणें आहे. पण अजून पावसास ठिकाण नाहीं. रायचूर, लिंगसागर, गुलबुर्गा व नळदुर्ग हे दुष्काळाचे मुख्य जिल्हे असून त्यांत हल्लीं बरी स्थिती असल्यामुळें त्यांतलीं कांहीं दुष्काळ कामें लवकरच बंद करण्याची वेळही आली आहे असें सांगतात.

बऱ्हाणपूर तालुक्यांतले लोक दुष्काळास त्रासून जनावरें मारून खाऊं लागले आहेत असें सांगतात !

३६ व्या पलटणीचा क्या. गार्डन यास, लाहोराजवळ पार्चिनर येथें त्या पलटणींतल्या एका शिपायानें गोळी घालून ठार केलें. त्या शिपायास चिथविणारीं पुण्याचीं पत्रेंच बहुधा असतील आणि त्याकरतां पुण्याच्या लोकांवर आणखी एक जादा पोलीस बसविणें ही लाहोर सरकारास अवश्य वाटेल!

अफगाणिस्थानांत टोळधाड शिरून शेतें व फळफळावळ यांची नासाडी करीत आहे.

ग्रीकच्या सरहद्दीबद्दल निकालाचा ठराव करा असा बड्या राजांच्या वकिलांनीं टर्कीच्या मागें तगादा लावला व त्यांस टर्कीकडून जो जबाब मिळाला त्यावरून तह होण्यास हरकत झाली आहे.

टर्कीच्या मुख्य वजिरानें सुलतानास स्पष्टपणें असा जबाब दिला कीं, बड्या राजांच्या वकिलांनीं जी सरहद्द करावी असें योजलें आहे त्या सरहद्दीच्या तहावर आपण सही करणार नाहीं.

टर्कीं व लालबेनियन या जातीच्या २,००० लोकांच्या टोळीनें थिसली प्रांतांतल्या काळाबाका गांवावर हल्ला केला, तेव्हां गांवांतले बरेच लोक डोंगरांत पळून गेले व कांहींस कैद करून कांहींची कत्तल केली अशी इंग्रजी पत्रांची बातमी आहे.

कलकत्याचा दंगा व पुण्याचे खून यांच्या संबंधानें गेल्या आठवड्यांत विलायतच्या पार्लमेन्ट सभेंत स्टेट सेक्रेटरी यांस कित्येक प्रश्न झाले. त्यांतील एके दिवशींच्या प्रश्नांस उत्तरें देतांना स्टेट सेक्रेटरी यांणीं सांगितलें कीं, कलकत्याच्या दंग्यास उगीच महत्व देण्यांत अर्थ नाहीं. तो स्थानिक व क्षणिक प्रकार असून गव्हरनर जनरल यांणीं त्याचा तावडतोब बंदोबस्तही केला. त्या दंगेखोरांशीं तडजोड करून मिटवामिटव करण्याचा सरकारचा इरादाच नाहीं. तसेंच पुण्याच्या खुनांच्या बाबतींत तें सरकार आरंभापासून अगदीं विचारानेंच वागत आलेलें आहे. असेंही त्याणी सांगितलें.

हिंदुस्थानांत सध्या २०३९० १/४ मैल आगगाडीचा रस्ता चालू आहे.

युनैटेड स्टेट्समध्यें बेडकाची उत्पत्ती करून ते विकण्याचीं ठिकाणें ५७ आहेत.

हिंदुस्थानांतल्या आगगाड्यात आजपर्यंत २७४०७२७।८१ रुपये भांडवल गुंतले आहे.

अगदीं पहिल्यानें लिहावयाचे टांक काढले तेव्हां एकएका टाकास ३० तीस तीस शिलींग किंमत पडे.

ग्रेटब्रिटनमध्यें लोक तंबाखू ओढण्याच्या व्यसनांत दरसाल सुमारें २२,०००००० पौंड खर्चतात.

अंडामन बेटांतल्या लोकांइतके खुजे लोक दुसरे कोठेंही नाहींत. बहुतेकांची उंची चार फुटांहून जास्त नसते.

पृथ्वीवर प्राण्यांची उत्पत्ती झाल्यास सुमारें तीन कोटी वर्षें झालीं असावीं, असें लॉर्ड केल्व्हिन ह्यांचें मत आहे.

पृथ्वीवरील सगळ्या समुद्रांत मिळून ७०००००० घनमैल मीठ असेल पाहिजे, असें हिशेब करून काढिलें आहे.

नानाफडणीसांच्या दप्तरांत इंग्रजांच्या आरमारचे नकाशे, इंग्रजांच्या कौंसलांतल्या भाषणाचे सारांश, कौंसलदारांचें स्वभावाचें वर्णन, इत्यादि गोष्टी आहेत, असें कोणीएक गृहस्थ खात्रीनें सांगतात.

ठा० ग०

थेसलीचा राजा रशियाच्या सेंटपिटसबर्ग राजधानींत जाऊन पोचला आहे.

टर्की व ग्रीस यामध्यें सल्ला करण्याचें काम तातडीनें कसें चालवावें त्यासंबंधीं कित्येक सूचनांची एक यादी रशियोनें प्रसिद्ध केली आहे.

सुदानच्या खलिफावर इंग्लंड किंवा इजिप्त कडून लढाई झाल्यास त्या प्रसंगीं अबिसिनिया अगदीं अलग राहील अशी कबुलायत त्याजपासून लिहून घेतली आहे.

विजयानगरच्या मरहूम महाराजांच्या मातोश्री डावरेज महाराणींनीं जो ३५ लक्षांचा दावा केला होता त्याचे पेव्यांत त्यांस विजयानगरची जहागीरी देण्यांत आल्याबद्दलचें समजतें.

सयामच्या राजास गेल्या बुधवारीं सेन्टपिटसबर्ग येथें रशियाच्या शहाकडून मेजवानी झाली त्यावेळीं सयामच्या राजानें 'रशियाच्या शहास सयामचे लोक आपला बळंवत मित्र समजतात' अशा अर्थाचें भाषण केलें होतें.

देशी वर्तमान पत्रासंबंधीं कायदा करण्याबद्दल अंग्लो इंडियन पत्रांनीं जी ओरड चालविली होती त्या संबंधीचा प्रश्न पार्लमेंटांत निघाला होता त्यावेळीं चालू रिवाजाबाहेर या बाबतींत फेरफार करण्याची कांहीं जरूर नाहीं असा प्रधानांनीं स्पष्ट जबाब दिला.

स० वि०

प्रो० गोखले— हे विलायतेंत वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्या करितां गेले आहेत. ज्युबिलीच्या वेळीं ते आणि इकडून साक्ष देण्याकरितां गेलेली दुसरी मंडळी सभेमध्यें हिंदुस्थानची दुर्दशा राज्यकारभारामुळें झालेली सांगत आहेत. त्यांचें ह्मणणें खोडून काढण्या करितां लॉर्ड जार्जहॅमिल्टन, हिंदुस्थानचे सेक्रेटरी, यांनीं एक पत्र आपल्या सहीनें तिकडील वर्तमानपत्रात छापलें आहे.

प्रो. गोखले यांची तिकडे फारच चहा होत आहे. इंग्रजी भाषेच्या प्राविण्यानें, अस्खलित भाषेनें, ते तिकडील लोकांवर आपली छाप बसवीत आहेत. त्यांच्या स्वरूपाच्या सौंदर्यानेंही तिकडे लोक मोहून गेले आहेत, ते तिकडे उपरणें-पगडीच्या पेहरावानें फिरतात.

प्रस्तुतच्या ग्रीसच्या राज्याविषयीं अशी आख्यायिका सांगतात कीं, सन १८८२ सालीं हिवाळ्याच्या एके रात्रीस ग्रीसचे महाराज सडेच फिरावयास निघाले. फिरता फिरतां आथेन्स शहराजवळ पायरीस बंदरावर १ पहारेकरी त्यांस भेटला. त्यानें विचारलें– 'कोण आहे' त्यास दाद न देतां राजे साहेब निसटून जाऊं लागले. तेव्हां पहारेकरी शिपायानें बार झाडला तो त्याच्या खांबाला चाटून गेला. पुढें दुसरे दिवशीं राजेसाहेबांकडून खासगी रीतीनें सदर शिपायास भोजनाचें बोलावणें आलें. एवढ्या मानाचें कारण काय याची अटकळ त्याला मुळींच होईना. मग साशंक मनानें तो राजवाड्यांत राजपंक्तीचा लाभ घेण्यास तर गेला. तेव्हां आदले रात्रीची गोळी घातल्याची गोष्ट निघाल्यावर बिचाऱ्या शिपाई बोवाची कोण तारंबळ उडाली ती सांगतां येत नाहीं. परंतु महाराजांनीं त्याच्या दक्षतेबद्दल शाबासकी देऊन त्यास लगेंच सरदार केलें.

अपघात— वडगांवास धनरवाड्यांतील सुमारें ५०० मेंढरांनीं वीज कडकडल्यामुळें घाबरून कड्यावरून खालीं उड्या घातल्या व खालीं ओढ्यांत पावसाचें एकाएकीं पाणी आल्यामुळें सदर मेंढरें वाहून गेल्याचें कळतें.

आ. व.

मूर्तीची चोरी— वृंदावन येथील जैनलोकांच्या देवळांत जी अंगुष्ट प्रमाण हिऱ्याची श्री जिनेश्वराची मूर्ती होती ती कोणी चोरून नेली आहे.

निजाम सरकाराला पैशाची फार तूट पडली असून २५ लाखांची कर्जाची बाब कमी करावी, प्राप्तीवर कर बसवावा, मयताची मिळकत वारसास देते वेळेस कर घ्यावा असा विचार चालला आहे.

जर्मन तोफखान्यांत नवीन तऱ्हेच्या तोफांची भरती केलेली आहे. या तोफांतून दर मिनिटास ६० गोळे उडवितां येतात व गोळा पांच मैलांच्या पल्ल्यावर जातो.

महाऋण— निजामसरकारांनीं कलकत्त्याच्या लोकांकडून एक कोट रु० कर्ज काढण्याचें ठरविलें असून, तेथील बंगाल ब्यांकेनें त्या कर्जाचें टेंडरही निजामाकडे पाठविलें आहे.

फुलांचें घड्याळ—सोन्याचें घड्याळ, रुप्याचें घड्याळ, हिरे माणक्याचें घड्याळ अशीं घड्याळें आपण पाहिलीं असतील व आपणपैकीं कित्येक भाग्यवान मंडळीनें तीं वापरलीं असतील. पण 'फुलांचें घड्याळ' असल्याचें आपल्या ऐकिवांत आहे काय? नसेल तर सांगतों ऐका. अकलेच्या जोरावर मनुष्य कांहीं करूं शकतो. त्याचप्रमाणें एका चतुर मनुष्यानें हें फुलांचें घड्याळ तयार केलें आहे. हें चमत्कारिक घड्याळ शिकागो येथील एका सार्वजनिक बागेंत आहे. हें घड्याळ नुसतें दिसायलाच चमत्कारिक आहे असें नसून तें चालतेंही बिनचूक. इतर घड्याळांच्या योगानें जशीं बरोबर वेळ समजते तशीच ह्या घड्याळा मुळें समजते. आतां आपण ह्या घड्याळ तील यंत्ररचना पाहूं. इतर घड्याळांतल्या प्रमाणें ह्यात पेंडुलम, स्प्रिंग, आणि लिव्हर आणि दुसऱ्या हजारों भानगडी असतील असें जर आपणाला वाटत असेल तर तो केवळ आपला भ्रम आहे. तो 'टिकटिकादि' खटपट ह्यांत ठेविलेलीच नाहीं. तर मग हें घड्याळ बनविलेलें आहे तरी कसें ? एका मोठ्या वाटोळ्या कुंडींत सुमारें २० एक फुलें निरनिराळ्या वेळीं फुलतात. त्यावर वेळांचें मान बसविलें आहे. रात्रौ बरोबर दोन वाजतां "प्रभात वैभव" नामक फुलाची कळी फुलूं लागते. ती फुलूं लागली ह्मणजे बरोबर दोन वाजले असें समजावें. पुढें तिनापासून बारा वाजेपर्यंत फुलणारीं फुलें बरोबर टाइमला फुलून बरोबर वेळ समजते. त्यानंतर एक तास हें घड्याळ विसावा घेतें. कारण एक वाजतां फुलणारें फूल अजून सांपडलें नाहीं. येणेंप्रमाणें रात्रीं आठ वाजेपर्यंत हें घड्याळ आपलें काम बिनचूक करितें आठ वाजतां रात्रीं फुलणारें फूल फुलून झाल्यावर ह्या घड्याळाचें काम बंद पडतें. आमच्या येथील सूर्यविकासी व चंद्रविकासी कमल, सूर्यफूल, पारिजातक सदाफूल वगैरे फुलांचेंही घड्याळ बनवितां येईल. ज्यांना बागबगीच्याचा शोक आहे अशा लोकांनीं यत्न करून पहावा. साधल्यास मोठी मौज आहे.

न्या. सु.

कैदी सोडले—या ज्युबिलीसमारंभाबद्दल जे कैदी सोडले त्यांचा तपशील:— हिंदुस्थानांतल्या तुरुगांतले पुरुष १७,७९०; स्त्रिया १,७८१; काळ्यापाण्याच्या अंदमान बेटांतले पुरुष ३७०; स्त्रिया ३०; दिवाणी कैदी १०२; असे एकंदर २०,०७४ कैदी सोडले. १०० रुपये पर्यंतच्या कर्जाबद्दल जे खरोखरी दरिद्री लोक दिवाणी तुरुगांत असतील त्यांच्या रकमा सरकारी खजिन्यांतून सावकारांस देऊन तशा कैद्यास बंधमुक्त करावें असें ठरलें होतें व त्याप्रमाणें फक्त १०२ कैदीच सुटले.

कलकत्याच्या दंग्यासंबंधानें आतां निराळीच बातमी आली आहे. वांध्यांत पडलेली जमीन मालकांनीं दंगेखोर मुसलमानांस परत दिली अशी जी बातमी होती ती खोटी असून सर टागोर यांनीं स्वतः आतां असें प्रसिद्ध केल्याचें समजतें कीं, माझी त्या जमिनीवर फक्त तहाहयात मालकी आहे; तिचे खरे मालक लंडन शहरांतील एक कंपनी असल्या मुळें मला ती परत देण्याचा मुळींच अधिकार नाहीं. जमीन परत देण्याची बातमी मुसलमान पुढाऱ्यांनीं आपल्या जातभाईचा राग शांत करण्याकरितां पसरविली होती असें ह्मणतात.

क० त०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ८३, ८६
दुसरे खेपेस ........... ८१

Six monthly......... 3 ...... ... ..., 8 as
Single copy ............... ......... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 26 JULY 1897 NO 29

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २६ माहे जुलई सन १८९७ इ० अंक २९

### नोटीस

रा. रा. गोवराम सुरजकरण मारवाडी दुकान अंजनी बुजरुक तालुके मेहकर जिल्हा बुलडाणे यांस.

खालीं सही करणार याज कडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, आमचे डागिने सोन्याचे वजन तोळ एकशें चव्याहात्तर तोळे चार मासे पांच गुंजा १७४८४८९ प्रत्येक डाग नांववार व वजनवार तुमचे वहीवर लिहून दिलेला आहे. त्या प्रमाणें डागिने आह्मी तुह्मास अनेक वेळां मागितले असतां आज देतों उद्यां देतों परवां देतों असे ह्मणतां परंतु काहीं देत नाहीं. याज करितां ही नोटीस पावल्या तारखे पासून चार दिवसांत आमचे डागीने आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. वरील मुदती प्रमाणें तुमचे कडून न घडल्यास आह्मास कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल नोटिसीचा खर्च व कोर्ट खर्च तुमचे जवळून भरून घेऊं. कळावें तारीख १९ माहे जुलै सन १८९७ इसवी.

[ सही ]

विठ्ठल बागीराव कुळकर्णी मौजे अंजनी बुजरुख दस्तर खुद्द.

---

### नोटीस

श्रीमंत रा० रा० दिनानाथ गोपाळ साहू मैयत वारसि पुत्र पाडुरंग अज्ञान पालन करणार चंद्रभागा बाई वस्ती जळगांव यांस खाली सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मांस नोटीशीचा जबाब शुद्धवऱ्हाडींत दिला तो कायदेशीर नाहीं. मृत्यूपत्र जवळ असल्यानेच अधिकार प्राप्त होत नाहीं तर जिल्हा जडज्य कोर्टांत दाखल करून खरें करून घेऊन अधिकार पत्र मिळविलें पाहिजे. तसे, मृत्युपत्र करणार मैत होऊन पांच वर्षें झालीं तरी मैत दिनानाथ बावा साहेबांनीं केले नाहीं तेंव्हां तें मृत्युपत्र रद्द झाले. त्यांचे वारसास अधिकारपत्र मिळणार नाहीं. जर आपली समजूत मिळेल अशी असेल तर ही नोटीस पावल्या पासून १९ दिवसाचे आंत अधिकार पत्र मिळण्या विषयीं अर्ज करावा. तसे न करितां विनाकारण स्वस्थ बसून हक्क दाखवितां तो आह्मी न समजतां दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चा सुद्धां रक्कम घेऊं. तुह्माला पुन्हा खर्च करण्याची मनाई असे कळावें. तारीख २१ जुलै सन १८९७ इसवी.

( सही )

लक्ष्मीबाई जवजे गणपतलाल वैद्य वस्ती जलगांव तर्फे मुख्त्यार गोपाळ गणेश डिडोळकर

### जाहिरात

आह्मास आमचा जुन्या रुळा प्रमाणें इनाम असलेला गांव मौजे हिरडी प्रगणें डोंगरखेर्डे तालुके यवतमाळ जिल्हा वणी हा विकावयाचा आहे याचे क्षेत्रफळ ९०१ एकर २७ गुंठे आहे व आकार २३१८१२ आहे. हा गांव कोठेंही गहाण वगैरे नसून यंदा निमे जमीन साऱ्यानें दिली आहे व घरचीं शेतेंही पेरून तयार आहेत. ह्मणून ही संधी घालवूं नये ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावे अगर पत्र पाठवावें ह्मणजे खुलासा होईल. तारीख २०।७।९७

सही

पृथ्वीगीर हरीगीर यवतमाळ दस्तुर खुद

---

### PSALM OF LIFE

"Tell me not in mournful numbers
Life is but an empty dream!
For the soul is dead that slumbers
And things are not what they seem.

Life is real! Life is earnest
And the grave is not its goal;
Dust thou art, to dust returnest,
Was not spoken of the soul.

Not enjoyment, and not sorrow,
Is our destined end or our way;
But to act, that each to-morrow
Finds us further than to-day.

Art is long, and time is fleeting,
And our hearts, though stout and brave,
Still like muffled drums are beating
Funeral marches to the grave.

In the world's broad field of battle,
In the bivouac of life,
Be not like dumb, driven cattle!
Be a hero in the strife!

Trust no Future howe'er pleasant!
Let the dead Past bury its dead!
Act,—act in the living present!
Heart within, and God o'erhead!

Lives of great men all remind us
We can make our lives sublime;
And, departing, leave behind us
Foot prints on the sands of time:

Foot prints, that perhaps another,
Sailing o'er life's solemn main,
A forlorn and shipwreck'd brother,
Seeing, shall take heart again.

Let us then, be up and doing,
With a heart for any fate;
Still achieving, still pursuing
Learn to labour and to wait.

Longfellow.

### जीवित रहस्य

'जल-बुद्बुद-सम भव हा, निःसार स्वप्नि ची नरा क्रीडा।'
गीति अशा खिन्नमनें पढुनि मला दावितां वरी व्रीडा ॥ १ ॥
चैतन्य शून्य ज्याचा आत्मा नर तो मृतैव जाणावा,
वरिवरि वस्तु न पाहे मित्रा! तद्दढ-भाव उमगावा ॥ २ ॥
जीवित वास्तव आहे, 'उद्यम' वाटे तदीय आत्मा तो ॥
यम सदन वास केवळ जीवित हेतु न मनासि मानवतो ॥ ३ ॥
'तू मृत्तिकाचि होसी अंतीं मिळसील मृत्तिकेसि अशी'।
स्पष्टोक्ति देहगत ती आत्म्याला लावितोसि सांग कशी ॥ ४ ॥
विषयोप भोग केवळ चिंतेनें दग्धचित्त वा न कधीं।
उद्दिष्ट हेतु साधी ह्मणवुनि न वळी अशा पथा तव धी ॥ ५ ॥
'उद्यम' 'उद्यम' 'उद्यम' निशिदिनि 'उद्यम' सदा घडो कांहीं।
सतत स्व प्रगति असे वाटावी मानसा हुशारी ही ॥ ६ ॥
'चौसष्ठ कला चवदा विद्या' संख्या असे बहू मोठी।
काळ न थांबे क्षणभरि यास्तव वदतां 'उठ न हो कष्टी ॥ ७ ॥
अंतःकरण नरांचें चर्मावृत्त तें असें जरिसुदृढ
यमगृह गमनी दुंदुभि आजीवित वाजवी गमे गूढ ॥ ८ ॥
ब्रह्मांडगोल विस्तृत रणकंदन भूमिका गमे घोर।
सैनिक रक्षा गृह हें नरजीवित त्या स्थलीं असे थोर ॥ ९ ॥
मूक पशू हाकावें गोपाला पाहिजे तसें जगतीं।
'कर्ता' होउनि नांदे 'येथें;' तुज शोभते न पशुवृत्ति ॥ १० ॥
सुंदर भविष्य दिसतें परि सोडूनि द तदीय विश्वास।
'जें गेलें तें गतलें' त्याचा करिशी कशास हव्यास ॥ ११ ॥
हें 'वर्तमान' जागृत; विलसों कृतित्व सदैव या कालीं।
परमेश्वर द्रष्टा तो वरता, सद्बुद्धि मानसीं खालीं ॥ १२ ॥
स्वीय कृतिनें करितो मानव येथें उदात्त भव यात्रा।
अनुभव घेऊनि पाहे संतांचें वृत्त दिव्य ही मात्रा ॥ १३ ॥
कालोदधि पुलिनवर रेखियल्या स्पष्ट संत पद मुद्रा।
लोचन उघडुनि निरखी घेरी तव चित्त कोणती तंद्रा ॥ १४ ॥

---

वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ वद्य १२ शके १८१९

---

इंडियांत रेलवेचा प्रसार करण्या संबंधानें हिंदुस्थान सरकारची राज्यपद्धती चुकीची आहे आणि ती या देशाला लाभकारक नाहीं ही गोष्ट विशेष खुलाश्यानें मद्रासचे विद्वन्मणि रा. रा. जी. सुब्रह्मण आय्यर यांनीं प्रतिपादित केली आहे. लार्ड वेल्बी यांच्या अध्यक्षते खालीं बसलेल्या रायल कमिशन मंडळी पैकीं बहुतांचे रेलवेच्या प्रसारा विषयीं चुकीचे ग्रह आहेत आणि ते दूर करण्याचा प्रयत्न ह्मणून एक नामी लेख लिण्यांत आला आहे. चुकीचा ग्रह ह्मणजे असा कीं प्रचंड कर्ज काढून त्या कर्जाच्या फंडावर रेलवे सर्व देशभर विस्तृत केली तरी देखील ती गोष्ट या देशाला पक्की लाभप्रद आहे. रेलवेचें जाळें फैलावण्या विषयीं सरकारचा जो अविश्रांत खटाटोप चालला आहे त्या पासून देशाची सोडवणूक किंवा बचाव रेलवेच्या वृद्धीमुळें पक्या निश्चयानें होतो, आणि अगणित सांपत्तिक व नैतिक लाभ रेलवेच्या प्रसारा बरोबर सारखे वाढतात. पण ही समजूत अगदीं चुकीची आहे. रेलवेच्या वृद्धी पासून होणारे फायदे विनाकारण बहुलीकृत करून दाखविण्यांत येतात आणि रेलवेची वाढ जर कमी जलदीनें होईल तरच इंडियाच्या सांपतिक स्थितीला फायदेशीर होईल. रेलवे वाढविण्याचा दांडगा प्रयत्न मंदमंद करावा हीच राजनीती खऱ्या मुत्सद्दीपणाची होईल. जर इंडिया देशाची राज्यव्यवस्था स्वराज्याच्या पद्धतीवर असती व रेलवे सारख्या प्रचंड कार्याची सर्व उभारणी व व्यवस्था हीं राज्यकर्त्यांच्या हातीं ठेविल्यानें परराष्ट्रीय अंमलानें होणारे मुख्य दुष्परिणाम या देशाला न भोंवते तर रेलवे वाढविण्याची योजना मोठी नामी झाली असती ही गोष्ट सर्व इंडियन मुत्सद्यांस कबूल आहे. लार्ड वेल्बी साहेबांनीं कामिशनमध्यें उलट प्रश्न विचारतेवेळीं प्रतिपादिले आहे कीं रेलवे सुपाव्यानें उभारण्याचें कार्य इतर राष्ट्रवाल्यांनीं इंग्लंडांत काढलेल्या कर्जाऊ फंडावर चालविलें आणि त्या कृतीनें त्या त्या राष्ट्राचा कांहीं तोटा झाला नाहीं. ही गोष्ट खरी कीं आस्ट्रेलिआ, चीन, जपान व इतर राष्ट्रें यांनीं रेलवेच्या स्थापनेला लागणारें भांडवल मोठ्या व्याजाच्या परराष्ट्रीय कर्जावर उभारलें आहे. इंडियास वरील राष्ट्रां प्रमाणें ही हानि थांबविता किंवा कमी करितां येती पण इंडियांतून राज्यकर्त्यांचा हक्क म्हणून नाना रुपांनीं दरसाल ४९ कोट रुपये विलायतेस जातात, आणि निरनिराळ्या करांनीं गरीब इंडियन प्रजा नागवली आहे या गोष्टीमुळें इंडिया व इतर राष्ट्रें या मध्यें जमीन अस्मानाचें अंतर पडतें आणि आस्ट्रेलिया व चीन या राष्ट्रांतील स्वराज्याचे विचार या देशाला लागूं पडत नाहीं. या प्रचंड वार्षिक खंडणीमुळें सर्व देशाचें रक्त शोषिलें जात

आहे. आणि रेलवेच्या भांडवलोंचे व्याज ह्मणून सालिना तीस लक्ष पौंड या खंडणी मध्यें वाढ होते ही लहान सहान गोष्ट नाहीं. दुसरी गोष्ट या देशाला घातुक आहे ती अशी कीं युरोपियन लोक भारी पगारावर रेलवे मधून नेमल्यामुळें सहा हजार गोऱ्या लोकांना पगार दर वर्षी ८ लक्ष पौंड आमच्या देशांतील रेलवेच्या भांडवलावर विनाकारण बोजा पडतो. गोरा आफिसर बिलायतेहून आणविला ह्मणजे नेटीव लोकांच्या तोंडची भाकर हिसकाऊन घेतली जाते आणि राज्यकारभारांच्या कामा विषयीं वाकबगारपणा नेटिवांस येण्याची संधीही जाते. रायल कमिशनचा अभिप्राय असा उलट दिसतो कीं, इतके तोटे इंडियाच्या रेलवे पासून आहेत तथापि त्यांचे फायदे अधीक आहेत आणि ह्मणूनच प्रस्तुतची रेलवेचें दळणवळण वाढविण्याची राज्यव्यवस्था सर्व बाजूंनीं त्यांस ग्राह्य व चांगली वाटते

हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतात काळ पडला असतां, देशांतील अन्य प्रांतांतून व जगांतील दूर दूरच्या राष्ट्रांतून देखील, तेथें धान्याचा पुरवठा करण्याचें कामीं रेलवे पासून फार मोठी मदत होणारी आहे असे लार्ड वेल्बी साहेबास वाटतें. परंतु, २०,००० मैल रेलवे आजला देशांत चालूं असतांना देखील दुष्काळ पडून हजारों लोकांना उपासमार सोसण्याची पाळी आली आहे ही गोष्ट धडधडींत आपल्या दृष्टीसमोर असल्यानें लार्ड साहेबांचा समज खरा मानण्यास जागा नाहीं.

आतां, ही गोष्ट खरी आहे कीं देशांतील एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत धान्य नेलें जाऊन काळ नसलेल्या ठिकाणीं कांहीं अंशीं लोकास धान्य मिळेल असें करण्याच्या कामीं रेल्वेचा मोठा उपयोग होतो. पण रेलवे कांहीं फुकट धान्य नेत नाहीं; आणि ह्मणून अशा रीतीनें बाहेर प्रांतांतून आलेलें धान्य नेहमींच्या दरापेक्षां बऱ्याच जास्त दरानें काळ पडलेल्या भागांत, विकलें जातें. पृथ्वी वरील इतर राष्ट्रांतून धान्याचा पुरवठा हिंदुस्थानांत करण्यास रेलवे पासून मोठा उपयोग होईल ह्या ह्मणण्यांत ही कांहीं अर्थ नाहीं; कारण, हल्लींच्या दुष्काळांत तसा अनुभव मुळींच आलेला नाहीं. वास्तविक प्रकार असा आहे कीं, हिंदुस्थानांत सांप्रत धान्याचें दुर्भिक्ष जितक्या प्रमाणानें आहे तितक्याच प्रमाणानें, किंबहुना ज्यास्त प्रमाणानें, पैशाचेंही दुर्भिक्ष्य आहे. हिंदुस्थानांतील प्रजा दिवसें दिवस जास्त निस्त्राण होत चालली आहे आणि धान्य मिळण्या सारखें असतांनाही तें विकत घेण्या पुरतें, तींत आतां सामर्थ्य राहिलें नाहीं. या करितां रेलवे पासून दुष्काळाचा प्रतिकार होऊन देशाची सांपत्तिक स्थिति सुधारेल या प्रमेयांत कांहीं सत्व नाहीं.

रेलवे पासून धान्यास चांगला भाव येऊन शेतकरी लोकांचा फायदा होतो असें सरकारचें मत आहे; परंतु, सरकारांतून जे धान्याचे भाव प्रसिद्ध होतात ते सत्य मानून चालले असतां वस्तुस्थितीचा विपर्यास होईल. तथापि आपण गृहीत घेऊन चालूं कीं, रेलवे मुळें पहिल्या पेक्षां धान्यास आतां चांगले भाव येतात. परंतु या शेतकरी लोकांचा कांहीं खरोखरी फायदा होतो कीं काय हें आपणास पाहिलें पाहिजे. सरकारनें, सारा वसूल करण्याचा काळ पिकाऱ्या हंगामाच्या दिवसांत ठेविला आहे. धान्य तयार झाल्या बरोबर सारा देण्याकरितां सावकाराचें देणें देण्याकरितां व इतर घरखर्चा करितां ते बाजारांत आणणें शेतकऱ्यास भाग पडतें आणि एकाच वेळीं चोहोंकडून धान्याचा पुरवठा बाजारांत खपा पेक्षां फार जास्त झाल्याने भाव अगदीं मंद होतात. अशावेळीं व्यापारी लोक खरेदी करून धान्याची चणचण असेत तेव्हां ते विक्रीस काढून तेजीच्या भावानें आलेले पैसे आपल्या गांठीं बांधितात आणि शेतकऱ्याचें पदरीं फक्त मंदीच्या भावानें आलेले पैसे पडून वास्तविक पाहतां, त्याला धान्याच्या वाढलेल्या भावाचा कांहीं एक फायदा मिळत नाहीं.

रेलवेच्या वाढी पासून हिंदुस्थानांत फायद्या बरोबरच हानीहि पण कशी होत हें विवेचन करण्याची आणखी एक दिशा आहे. ती ही कीं, रेलवेपासून देशी हुन्नरांची व देशी धंद्यांची पायमल्ली होऊन त्यांत गोंधळ उडून जातो. हिंदुस्थान देश कांहीं नवीन वसलेल्या देशांपैकीं नव्हे. हा फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत असल्यानें यांत समाजव्यवस्था इतक्या दीर्घ काळा पासून चालत आली आहे कीं, तेव्हां इतर कांहीं राष्ट्रें आणि त्यांचीं हल्लींची रेलवे आदिकरून अन्य सुधारेलीं साधनें यांचा पत्ता देखील नव्हता. यामुळें असा प्रकार घडून येतो कीं, ज्या ज्या प्रांतांत रेल्वेचा प्रवेश होतो त्या त्या प्रांतांतील देशी उद्योग रसांतळीं जातात. अशा उद्योगावरच पूर्वी पुष्कळांचा निर्वाह होत असे आणि दीर्घ काळापासून चालत आल्या कारणानें ते उद्योग लोकांच्या अगदीं अंगवळणीं पडले होते. ह्या रेलवेपासून एकंदर देशी धंद्याचें नुकसान झालें आहे; तरी पण त्यांत कोष्टी कामाचें फारच फार मोठें नुकसान झालें आहे. सत्राव्या शतकापर्यंत जो देश स्वतःस व इतर देशांस आपल्या सुंदर वस्त्रांनीं भूषित करीत असे त्याच हिंदुस्थान देशांतून आतां हें उत्कृष्ट कोष्टी काम बहुतेक नाहींसें झालें आहे. एखाद्या प्रांतांत रेलवेचा प्रवेश झाला ह्मणजे त्यांत यंत्राच्या साह्यानें परराष्ट्रांनीं तयार केलेला सवंग माल भराभर येऊं लागतो आणि इकडे देशी धंद्याचा नाश देखील त्याच प्रमाणानें भराभर होऊं लागतो; पुष्कळ लोकांचे उद्योग धंदे बंद होतात आणि अशा रीतीनें लोकांची जी कंगाल स्थिती होते तिला रेलवे कारणीभूत होत. आतां कदाचित कोणी असें ह्मणेल कीं ज्या ज्या देशांत शारीर श्रमा ऐवजी यांत्रिक शक्तीचा उपयोग करून घेऊं लागले त्या त्या देशांत प्रथमारंभीं अशीच स्थिति उत्पन्न झाली होती ह्मणून हल्ली जी हिंदुस्थानांत क्रांति घडून येत आहे ती टाळतां येणें अशक्य आहे. गोष्ट खरी. परंतु ही क्रांति आणि हा नाश हल्लीं ज्या विलक्षण प्रमाणानें होत आहे तसा न करितां जर अस्ते अस्ते होत गेला तर तें फायदेशीर होणार नाहीं काय? रायल कमिशनचा असा समज झालेला 'दिसतो कीं हिंदुस्थान तर्फे झालेल्या साक्षीदारांचे ह्मणणें या पुढें रेलवेची वाढ होऊं न देतां ती आहे तशीच राखावी असा आहे. पण ही त्यांची चूक होय. ह्या साक्षीदारांचें ह्मणणें इतकेंच आहे कीं रेलवेची वाढ होणें ती हळू हळूंच झाली पाहिजे आणि रेलवे बांधण्या करितां जो पैसा पाहिजे आहे तो देशांतले देशांत जितका पैदा होणें शक्य असेल तितका पैदा केला पाहिजे. कारण ह्या रेल्वे कामांत आज जें परदेशीय भांडवल गुंतलें आहे त्याच्या व्याजाबद्दल जबर रक्कम हिंदुस्थानास द्यावी लागत आहे. यामुळें देशाचें अतोनात नुकसान होत आहे. सरासरी आठरा वर्षांत ही व्याजाची रकम २५ लाखा पासून तों ८७ लक्ष ५० हजार पर्यंत वाढली आहे नवीन रेलवे बांधण्याकरितां गुदस्त सालीं सरकारानें ३० कोटि रुपये कर्ज काढण्याचें मंजूर केलें आहे; या ३० कोटि पैकीं १० कोटि हिंदुस्थान आणि बाकी २० कोटि लंडन अशी वाटणी करण्याचें ठरलें आहे; ह्मणजे या व्यवस्थे पासून हल्लीं जें हिंदुस्थानास व्याज द्यावें लागत आहे त्यांत आणखी ५ लाखांची ज्यास्त भर पडणार. हिंदुस्थानांत रेलवेंत गुंतलेलें भांडवल जर आज लंडनच्या व्यापाऱ्यास परत देण्याचे मनांत आणलें. तर सरकारास २२०० कोटि रुपये हल्लीच्या भावानें द्यावें लागतील! या वरील कांहीं आकड्या वरून परकीय भांडवला पासून देशाचें कसें नुकसान होतें याची कांहीं कल्पना करितां येईल. ह्मणून, हिंदुस्थान तर्फे साक्षीदारांचें ह्मणणें आहे कीं, परकीय भांडवलानें या देशांत रेलवे न उभारतां या देशांत जे काय ३।४ कोटि भांडवल दरवर्षी कर्जाऊ मिळण्या सारखें आहे असें सरकार ह्मणतें तेवढ्यांत जितकी नवीन रेलवें बांधतां येईल तेवढीच बांधली जावी. अशा रीतीनें देशी भांडवल उपयोगांत आणलें असतां येथील लोकांचा अभिनंदनीय सांपत्तिक व नैतिक फायदा होईल. देशी भांडवल रेलवे करितां व अन्य कामा करितां काढणें हाच मार्ग शेवटीं सरकारास श्रेयस्कर व कल्याणास्पद होणार आहे.

---

✓आज काल पत्रांचा मुख्य विषय– मग तीं देशी असोत अथवा अंग्लो-इंडियन असोत-पुण्यांतील खून आणि कलकत्यांतील मुसलमानी बंड. या दोन प्रसंगाविषयीं आणि त्यांतल्या त्यांत पहिल्या प्रसंगा विषयीं अंग्लो- इंडियन पत्रकारांनीं व त्यांच्या बातमीदारांनीं आपल्या सोलिव मार्मिक विचारांचें जें सर्वांग-सुंदर प्रदर्शन मांडिलें आहे तें पाहून कोणा चांडालाची दृष्ट होऊं नये ह्मणून, मिठ मोहऱ्या उतरून त्यांना तिट्टा लाविला पाहिजे. वरील शहरांतील अराजनिष्ट लोकांस ताळ्यावर आणण्या करितां जे विलक्षण उपाय त्यांनीं सुचविले त्यांत एकानें आपल्या विकृत झालेल्या माथ्यांतून असा एक बहारीचा उपाय काढिला आहे कीं, पुण्याकलकत्यांतील मुलकी अम्मल चटसारा बंद करून त्या ऐवजी लष्करी अम्मल सुरू करावा; आणि लोकांची एकदां चांगली खोड मोडून इंग्रज सरकारचें सामर्थ्य किती प्रचंड आहे हें त्यांच्या निदर्शनास आणून द्यावें! अंग्लो इंडियनांचा हा स्वराष्ट्राच्या बाहु सामर्थ्या विषयींचा अभिमान खरोखर स्तुत्य होय; पण, हिंदुस्थानांत यूरोपियनांची संख्या ७० हजारांपेक्षां कांहीं फारशी ज्यास्त नाहीं; आणि या मुळें, नुसत्या अंगबळावर ह्या देशांचें स्वामित्व कायम राखणें कांहीं सोपें जाणार नाहीं. आजपर्यंत जे जे प्रमुख अधिकारी या देशांवर येऊन गेले त्यांचे प्रजेशीं वर्तन बहुशा सलोख्याचें आणि शिष्टपणाचें होतें. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य दीर्घकाल टिकण्यास वरील कर्तबगारी जितकी कारणीं येईल तितकी लष्करी धमक येणार नाहीं.

ह्या अंग्लो–इंडियन पत्रांत बातमीदारांचे ह्मणून प्रसिद्ध झालेल्या लेखांत ‘ नेटिव्ह ’ लोकांविषयीं जो मत्सर आणि जी अनुदारता प्रगट केली आहे ती माणसाच्या माणुसकीस लाज आणणारी आहे. ह्या लेखांचा ठरीव आरंभ “ मी हिंदुस्थानांत आज बरींच वर्षे काढलीं आहेत ” येथ पासून होतो आणि “ नेटिव्ह ” लोक सर्व मगरूर व लुच्चे आहेत ह्या विधानांत त्या लेखांचा अंत होतो. जणूं काय नुसतें हिंदुस्थानांत पुष्कळ दिवस राहण्यानें येथील प्रत्येक बाबींत-आणि त्यांत नेटिवांचा स्वभाव ह्या विषया सारख्या संकीर्ण विषयावर–बेधडक मत देण्याची पात्रता येते! अंग्लोइंडियनाचा आयुष्यक्रम येथें कोणत्या प्रकारानें होतो हें पाहिलें ह्मणजे नेटिव लोकांत मिसळून वागण्याचे प्रसंग त्यांच्या साऱ्या आयुष्यांत कितीसे येत असतील हें फोड करूनच कांहीं दाखवायास नको! ‘ नेटिव ’ स्वभावाचें निरीक्षण करण्याचे आपणास जे प्रसंग आले आहेत ह्मणून हे अंग्लोइंडियन ह्मणतात ते नेटिव लोक ह्मणजे ह्यांचे घोडेवाले अथवा बुटलेर एवढेंच काय ते समजले पाहिजेत. अब्रुदार व इभ्रतदार नेटिव लोकांशीं यांचा इतका निकट संबंध कधीं घडत नाहीं. या मुळें हलक्या नेटिवांत एखादा घोडेवाला ‘ मगरूर ’ निघाला अथवा बुटलेरांत एखादा ‘ लुच्चा ’ निघाला ह्मणून सर्व नेटिव लोकांच्या स्वभावा विषयीं बोलण्याचा अधिकार हिंदुस्थानांत कितीही वर्षे राहिलें तरी या अंग्लो-इंडियनास पोंहचत नाहीं.

हे पत्रकार नेटिव लोकांस राजद्रोही ह्मणून ह्मणतात. राजद्रोह ह्मणजे ज्यांत राजाचें नुकसान होऊन प्रजा व राजा या नात्यांत व्यत्यय येतो तो राजद्रोह असेल तर वास्तविक पाहतां ह्या अंग्लों-इंडियनांच्या वर्तनानें आणि लेखांनीं दिवसेंदिवस हिंदुस्थानांत प्रजा आणि राजा यां मधील संबंध कांहीं थोडासा चमत्कारीक झाला आहे. ह्मणजे आवश्वास, अप्रीति, तिरस्कार इत्याद विषवल्लीचें आरोपण झालें असून त्यावर हे अंग्लो-इंडियन जलसिंचन करीत आहेत. हल्लीं प्रजेंत जो असंतोष दिसून येतो त्याचा अभिश्राप सर्वं प्रकारें ह्या वर्गाच्या माथीं मारला पाहिजे; कारण ह्या वर्गाचे लेख नेटिवास इतके चीड आणणारे असतात व ह्यांचें वर्तन इतकें अरेरावीचें असतें कीं, जो मनुष्य कोटींतील प्राणी आहे त्याला तें सहन होणार नाहीं. नेटिव लोकांस राजद्रोही ह्मणण्या पेक्षां ह्या अंग्लो-इंडियनास स्वराष्ट्रद्रोही ह्मणणें योग्य होईल.

सुशिक्षित नेटिव लोक कायद्यास अनुसरून देशस्थिति सुधारण्यास जो राजकीय खटपट करीत आहेत तीचा हे अंग्लोइंडियन

भलताच अर्थ करितात. इंग्रजी अंमला पासून आमचा किती फायदा झाला आहे व हें राज्य आपल्यावर असण्याची हल्लीं किती अवश्यकता आहे हें प्रत्येक सुशीक्षित नेटिवांस चांगलें अवगत आहे. आणि ह्मणूनच इंग्रजी अमल दीर्घकाळ पर्यंत या देशांत अबाधित कसा कायम राखिला जाईल याची विवंचना करून सरकारास ते तडजोडीचे उपाय सुचवीत आहेत.

दुसरी एक गैरसमजाची गोष्ट ही आहे कीं, एका विशेष सरकारी वर्तनावर कडक टीका झाली म्हणजे तेवढ्या वरून प्रजा राजद्रोही बनते. त्याच प्रमाणें एखाद्या विशेष सरकारी व्यक्तीवर टीका झाली असली ह्मणजे अंग्लोइंडियनांस ती व्यक्तीविषयक न वाटतां सरकारा विरुद्ध वाटते; व एखाद्या यूरोपियनाचा खून खासगी द्वेषानें झाला असला तरी त्याला राजकीय गुन्ह्याचें स्वरूप प्राप्त होतें. असा विपरीत प्रकार ह्या लोकास कां दिसावा याचें कारण त्यांचा खोटा अभिमान होय.

अंग्लो-इंडियन पत्रकर्ते आपल्यावरची जबाबदारी ओळखून प्रजे विषयीं राजाच्या मनांत भलते सलते ग्रह उत्पन्न न करतील तो सुदिन समजला पाहिजे!

# The Berar Samachar

MONDAY JULY 26 1897

A free press is an ennobling institution. It records the progress of events. This is its first work. Further it exercises some sort of control over the events that mould our social fabric. A free press introduces salutary and solid influences. It acts as a public monitor and awakens people to the danger of wrong ways and wrong doings. It often throws a beacon-light to signalize dangers. It has a magnetic power of *construction*. It builds up a nation in so far as it pioneers the path of civilization. It serves mankind in the dignifying work of forming people's minds. It tunes them to certain thoughts and actions. Just as a nursery of plants is the home of a beautiful and ornamental garden so is the free press in the formation of a vast nationality.

A free press is thus valued for its predominence in educating man's mind. It is this educating force that sheds dignity and lustre on the journalistic profession. A newspaper is a public teacher and its work should always be viewed in that light. The duty of a journalist is therefore ardous and taxes all resources of a learned, well—informed and judging mind. Such a responsibility implies a high moral stand—point from which the writer to a newspaper should discharge his self—imposed duty. The success or otherwise depends strictly upon the ability with which and the manner in which this duty towards the public is discharged. A free press is a boon to India. It is must instructive to learn the main principles that led to its introduction in this country. We quote below the closing portion of the speech of Mr. Longuevillie Clarke who was chairman at a dinner given to do honor to Sir Charles Metcalfe as a Liberator of the Indian Press on the 9th of February 1838. He remarked as follows:—

"Let me now, gentlemen, examine how far the Freedom of the Press conduces to the weal of the governed: first, it confers on us freedom of discussion, which is the birth-right of every freeman. The Majesty of the people is no idle phrase, for it impors that which is really the case, that the true sovereignty is in the nation, and not in the ruler. All kings, all governors, are in fact but the servants of the State, placed at its head for their talents, their knowledge, and their virtues, justly respected for these qualities, and looked up to with gratitude for the benefits they dispense. I abate not one title from the honor which is their due, and yield to no man for the respect in which I hold them. Yet is the government of the State entrusted to their care, not because it is their property, not because the people are their serfs or slaves;—but in order that they may faithfully discharge the duties of governing. (Cheers.) Can it be endured then, that the people for whom they hold these trusts are not to question their acts, or that the right of discussion the measures of their rulers is to be denied to the State, for whose service and weal they have been crowned? Hence gentlemen, is it, that freedom of discussion is a freeman's birth-right; and by freeing the Press you likewise extend the blessings of knowledge and enlighten the people,—a measure which all allow is of vital importance to India. In those countries, where the Press is most free, is knowledge most diffused. It not only imparts instruction, but excites learning; and the man who is opposed to the freeing of the Indian Press, must be the foe to the enlightening the native (Loud cheers.) But, gentlemen, a stronger argument still remains. Free the Press, *and you strengthen the bond of union between the native and the British subjects.* (Loud cheers) Free the Press and you teach the natives what European countries are; what England is; you make them familiar with your laws, your manners, your arts, your sciences, your comforts, luxuries, wealth and independence; they draw the contrast between the state of things there, and in their own country here, they perceive the difference between the spear and sword, the rapine and violence of the Maratha and Pindaree and the protection of property and person by law. (Loud cheers.) Tell me then, will not the native find himself drawn towards the land and the nation who gave him security and justice in exchange fo destruction and plunder? Tell me wil not the bond of union be strengthened? And this is what the Freedom of the Press in India will surely achieve. (Loud cheers.) Gentlemen, have I drawn the question correctly? Have I correctlyr pourtrayed the past and the present state of the country, when the Press was enthralled and when the Press is free? Have I shown yon the blessings it bestows on the governors and the governed? If your hearts respond to these sentiments, up, I say, and drink to the "Freedom of the Indian Press."

It is not one or two newspapers that make up a *free press*. It is the collective voice of all the newspapers taken together. There are many opposing forces that chequer the different stages of a free press. No two thinkers think alike nor do two writers write alike. Freedom of opinion establishes the elements at war in a free press. It gives shapes to different shades of thinking and forms so many parties of the men in a nation. In India, foreign rule has established another principle of division. The Anglo-Indian press is, as a whole, opposed to the Native press. These two divisions form the two houses of an Indian Paliament. The days of singing praises to the honor and satisfaction of the ruling people are gone by. It is now a time when the ruling and the ruled races are being welded into a compact and harmonious whole. The Anglo Indians are aloof and do not like to share with the Natives the rights and privileges of a British nation. This conflict of interests has given a living vitality to the parties of the newspaper-world. The Anglo-Indian press uses its energies to paralyse the growth of the Native Press.

The Poona Tragedy and the Calcutta riots have supplied an occasion to the Anglo—Indians to fight a battle against the Natives. A proposal to gag the Native press is on the anvil of Lord George Hamilton in Council. The reason for this extra legislation is to punish the Native Newspapers that spread sedition and disaffection. The Indian Penal Code is found defective. The Native press is replete with sedition if sedition means an opposition set up against the omniscience and alleged wisdom of the ruling people. This peevish spirit to be vexed with a moderate, prudent and fore-sighed opposition implies ignorance, and arrogance on the part of the authorities. The progress of the Native press has marked the highest water-mark in point of civilization. No law can put back the dial in the face of the triumphs of the Western education. The Anglo Indian press will serve its masters well if it were to understand the high moral tone of the Native press. Otherwise. it is an ill wind that blows no body any good. We are afraid that the adage holds good about the present attitude of the the Anglo-Indian Press.

The Native press lays deeper and deeper the foundations of the British Empire when it sets right the abuses of the ruling powers in the hands of individual autocrats. From this pulpit of censorship, the Anglo-Indians want to dethrone the Native press. Whatever goes against the sweet whim of the ruling people is sedition in the long run. We however still hope to enjoy immunity from punishment for such cheap and plain—spoken seditions.

## वऱ्हाड

हवामान— पाऊस बरा झाला. शेतीच्या पेरण्या चालू आहेत व कोठें कोठें लहान लहान रोपे उगवले आहेत. एकंदर पाऊस ६।७ इंचें झाला. हवेंत गारवा वाटतो. रोगराई साधारण आहे. हवेचा उपद्रवही तुरळक आहे.

रा० रा० विनायक आप्पाजी काणे तहशिलदार, अकोट हे मानिस्त्रेट वर्ग २ चे असून त्या वर्गाप्रमाणें फटके मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार त्यांस देण्यांत आला आहे.

मि० अजिजुद्दीन असि० कमिशनर यांस येथील मुनसिपालिटींत सभासद नेमल्या अन्वयें ते मुनसिपल कामें मोठ्या उत्साहानें करूं लागले आहेत.

लेफटेनंट हेग यांची बदली कलकत्यास झाल्यामुळें त्यांनीं यवतमाळ मुनसिपालिटीच्या चेअरमनपणाचा राजिनामा दिला. त्यांच्या ऐवजी क्याप्टन माडिट, आफि. डिपुटी कमिशनर यांस मुनसिपल सभासद नेमण्यांस आलें.

रा. रा. गिरगांव रामचंद्र तहशीलदार वर्ग १ यांनीं पेनशन घेतल्यामुळें खालील बढत्या देण्यांत आल्या:—

| रा. रा. | बढतीचा वर्ग |
|---|---|
| वामन गणेश | १ ला |
| मीर अन्वरअल्ली आफि. एकस्ट्रा असि. कमि. | २ रा. |
| शाबासखा | ३ रा. |
| लक्ष्मण गोपाळ देशपांडे | ४ था |

आणि रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर क्लार्क आफ कोर्ट यांस दर्यापूरास आफिशिएटींग तहशीलदार नेमून दर्यापूराहून रा. रा. कृष्णाजी अनंत यांची बदली चांदूर तहशिलीवर केली.

मे. प्रीडो साहेब हे गेल्या बुधवारीं खामगांवास जाऊन आणि तेथून आल्या नंतर शुक्रवारीं आकोटास गेले. आकोटाहून काल परत आकाल्यास आले. आकोटास तहशिल कचेरी तपासली. दुष्काळा संबंधी चौकशी केली, आणि मुनसिपल सभासदांच्या भेटी घेतल्या.

मि. ग्यालोवे पोलीस सुपरिंटेंडेंट यांची स्वारी आकोटास तळ देऊन चार पांच दिवस आहे. कोणती मोठी चौकशी चालू आहे तें कळत नाहीं.

गेल्या आठवड्यांत कुरुम जवळ एका बाईचें प्रेत मेल ट्रेनीच्या गार्डास दिसरूं खुनाचा तपास चालू आहे.

इंडियन दुष्काळ फंडांतून गेल्या मंगळवारीं रुपये २१,९९००० वाटण्यांत आले त्या पैकीं वऱ्हाड प्रांताच्या वांट्याला रुपये १०००० आले. एकंदर वऱ्हाडाला ९०००० रुपये मिळाले.

## नोटीस

नोटीस बेशमी भीलाराम बालाप्रसाद राहणार कसबे रिसोड यासी नोटीस देणार उदाराम गंगाराम साहु दुकान मौजे मोप प्रगणे रिसोड तालुके तालुके वाशीम जिल्हे वाशीम सुमार सन १३०७ फसली कारणे नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडून आमची गहाणखता बद्दल रकम घेणे आहे ती शेंपर १०० याचे व्याज सन १८८४।८५ साला पासून घेणे आहे त्या पैकीं तुह्मी रुपये १६९८८६ वसूल दिला तो मिती वैशाख शुद्ध १ संवत १९४६ मारवाडी शिवप्रसाद भारुका रिसवडकर यांच्यापाशीं दिला ती रकम आह्मी मुजरा घेऊन बाकी राहिलेली रकम व व्याज आज तारीखे पावेतो तुमचे कडेस घेणे आहे ते आज तारिखे पासून ह्मणजे १५ दिवसाचे आंत नोटिस पावल्या पासून आमचे रकमेचा निकाल करावा अगर तो न केल्यास रिती प्रमाणें नोटिसीचे पैसे जेवढे लागले असतील ते मिळून दिवणी मार्गे फिर्याद करून जेव्हढा पैसा लागेल तो तुमचे कडून भरून घेण्यांत येईल हे खूप समजावे व ऐन रकम व्याजासह घेतले जाईल पुढें तुमचा जबाब कोणतेच प्रकारची ऐकिला जाणार नाहीं करिता काय जबाब देणे असेल तो देणे कळावे तारीख २१ माहे जुलई सन १८९७ इसवी दस्तुर.

(सही)

उदाराम गंगाराम मारवाडी दुकान मोप दस्तुर बनालालचा खुद्द.

## वर्तमानसार

जिवंत शिडी अथवा राक्षसी—मॅगवाय नांवाच्या नवी बायकोचें प्रदर्शन मांडून पैशाची उत्पानी चालविली आहे. ही बायको २४ वर्षाची अल्पवयीच आहे. तथापि ७॥ फूट उंच असून अजानुबाहु आहे. रस्त्यावरील म्युनिसिपालिटीचें उंच कंदील सहज उभें राहून तिला लावतां येतात. तिला शिडीचें कारण मुळींच लागत नाहीं. ह्या बाईला रोज एक पायलीचा भात व कोंबडी वगैरे २१३ लागतात एवढा तिचा आहार आहे ! ! तिनें दोन लग्नें केलीं; परंतु असली ही नाजुक पुतळी उपभोगण्याचें त्या नवऱ्यांच्या नशिबीं नसल्यामुळें ते दोन्ही ही मेले. आतां ती विधवा झालेली आहे.

न्या. सु.

सयामचा राजा युरोपांत प्रवास करित करित हल्लीं रशियांत गेला आहे. फ्रेंच लोक आपणास पुढेंमागें अधिक त्रास देतील या भीतीस्तव त्याचा हेतु इंग्रज लोकांची मदत घेण्याचा होता. ह्मणून तो इंग्लंडांत जाणार होता; परंतु तिकडे न जातां तो पुढें रशियांत गेला. तेथें रशिया आणि सयामचा राजा यांच्यामध्यें असा तह झाला कीं, सयामच्या पलटणीस रशियानें कवाईत शिकवावी. या तहाप्रमाणें रशियन पलटणींचे कांहीं अधिकारी सयामांत पाठविण्याकरितां रशियानें तयार केले आहेत; आणि शत्रूपासून तुझें रक्षण केलें जाईल, असेंही आश्वासन रशियानें त्यास दिलें आहे. मि. कर्झन यांचें नेहमीं असें ह्मणणें आहे कीं हिंदुस्थानच्या उत्तरेस काबूल आणि रशिया, हीं दोन मोठीं अनिवार्य विघ्नें इंग्रज लोकास नेहमींचीं होऊन बसलीं आहेत.

बेळगांव येथील किलियानिक व आसपास शेतांत एक प्रकारचे किडे उत्पन्न होऊन त्यांनीं आलेल्या पिकाची व गवताची फारच नासाडी चालविली आहे.

कैदी, भिकारी आणि मेलेलीं माणसें यांचे दहा लाख रुपयांचें केंस दरसाल चिनाहून येतात.

रशियांतून अशी एक बातमी आली आहे कीं, इंग्लंडचा पाडाव करण्याकरितां युरोपखंडांतील बडेबडे तिवे राने एकवट होऊन अडथळा करण्याच्या विचारांत आहेत. तुह्मी इजिप्तचा कबजा लवकर सोडा असें ते तिवे एकत्र होऊन इंग्लंडास सांगणार व तंटा उपस्थित करणार रशिया व फ्रान्स हे दोघे असें करण्यास तयार आहेत, पण जर्मनीची थोडीशी दिरंगाई दिसते.

जर्मन तोफखान्यांत नवीन तऱ्हेच्या तोफांची भरती केलेली आहे. या तोफांतून दर मिनीटास ६० गोळे उडवितां येतात व गोळा पांच मैलांच्या पल्यावर जातो.

फिनल्यांड येथें दरवर्षी विनवारसी, वेडे ह्मातारे अशा लोकांचा १ बाजार भरवून लिलांव करण्यांत येतो. तिकडील शेतकरी लोक त्यांची खरेदी करून त्यांच्या पासून बैलांकडून केली जाणारीं शेतकीचीं कामें करून घेतात.

पार्सलाच्या संबंधानें सवलत—रजिस्टर किंवा अनरजिस्टर इन्ल्यांड पार्सल पाठविण्यास पोष्टांत १ पिवळी पावती भरून द्यावी लागत असे तो त्रास पोष्ट खात्यानें दुरविला. आतां हंशिलाच्या टिकिटा पार्सलावर लावून तें पोष्टांत दिलें ह्मणजे मालकांस पावती मिळेल अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. बरी सोय झाली.

सपगांव तालुक्यांतील गोवन कोप गांवीं ४०, ५० दरवडे खोरांनीं एका वाण्याच्या घरावर दरवडा घालून ३३,००० रुपये नेले.

आसाम दार्जिलिंग या प्रांतांत तारायंत्रांच्या तारा तुटल्याचें समजतें. आर्यवर्त.

उतरण येथील एका व्यापाऱ्यानें ऋण कन्याला घरांत आणून कोंडून ठेविले होते. त्याबद्दल त्याला पांच दिवसाची कैद आणि पंधरा रुपये दंड, याप्रमाणें शिक्षा झाली. इकडे व्यापाऱ्यांनीं लक्ष द्यावें.

मध्यप्रांतांत पोटाची खळगी भरण्याकरितां मनुष्यें कुत्रीं देखील खाऊं लागलीं. हर ! हर ! हीच कां राज्य व्यवस्था !

पुणें जि० त माडाचे झाडाचे पिठावर कांहीं लोक गुजरण करीत आहेत. या राज्यांत लांकडे खाण्यांत यावीत !

घेड ब्राह्मणः—हे हेडिंग पाहून वाचक ह्मणतील कीं, एडिटरला वेड लागलें; नाहीं, तसा प्रकार नाहीं. खरोखरच जगांत घेड ब्राह्मण आहेत ! ब्राह्मणामध्यें नाना प्रकारच्या जाती आहेत. कर्मनिष्ठ अस्सल ब्राह्मण वेगळे. केवळ कार्तीक स्वामीचे भिडेनें ब्राह्मण जननीला शिणवून त्या कुलात मात्र जन्मास आलेले, परंतु स्वैर आचरणानें पावन झालेले नानाविध ब्राह्मण आहेत. आपआपल्या कर्तबगारीचे जोरावर कोणी मराठे ब्राह्मण झाले आहेत, कोणी मुसलमान ब्राह्मण झाले आहेत, कोणी घेड ब्राह्मण झाले आहेत ! ज्या जातीकडून गुप्त कां होईना पुनीत झाले आहेत, त्या जातींचे नांव मिळविलें आहे. ही ज्याची त्याची पूर्व पुण्याई आहे. आज या गोष्टीचें स्मरण होण्याचें कारण असें कीं नुकतें एके ठिकाणीं कांहीं घेड ब्राह्मण अवचित आढळले आहेत अशी खबर आहे. या ब्राह्मणानां गोमांसाची गोडी लागून ते नित्य नियमानें रात्रीं गुप्तपणें सोल्जराचे उच्छिष्ट—आह्मी चुकलों—प्रसाद भक्षण करण्याला जात असत. ही गोष्ट तेथील अधिकाऱ्यानां कळून त्यांनीं त्यानां पकडलें आणि त्यांना उघडकीस आणलें असें ह्मणतात. ही मोठी संतोषाची गोष्ट होय. आमचे मतें मराठे ब्राह्मणापेक्षां मुसलमान आणि घेड ब्राह्मण फार पूज्य आहेत. कोणा मोठ्या भाविकांना मनोभावानें ब्राह्मणाची आणि गाईची पूजा करून चरण तीर्थ घ्यावयाचें असेल तर त्यांणीं मुसलमान आणि घेड ब्राह्मणाकडे जावें. कारण ब्राह्मणाची आणि गाईची पृथक पूजा करण्याची यातायात नको. मुसलमान किंवा घेड ब्राह्मणाला पूजिलें ह्मणजे आंत सर्व आलें. त्यांच्या पोटांत गोमाता आहेच ! अस्तु.

दी० बं०

'टाईम्स आफ इंडियाच्या' अंकांत पुण्याहून त्यास छापण्या करितां कांहीं पत्रें जात होतीं त्या विषयीं जे निर्गल प्रलाप केले आहेत ते पाहून आमच्या बंधूच्या निर्लज्जपणाची आह्मांस कींव येते. आमच्या बंधूस पुण्याच्या संबंधाच्या माहितीची गरज नव्हती तर त्यांनीं मोठ्या सौम्य व इंग्रजी नी टनेटकेपणास अनुरूप अशा रीतीनें त्या पत्रांस रजा द्यावयाची होती परंतु 'पुण्यावर विनाकारण काहूर माजलें आहे व तुमच्या पैकींच एका मोठ्या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्या कडेस त्या कृत्याचा दोष येत आहे' असें लिहून आल्यामुळें स्वज्ञात्याभिमानांध होऊन व विनाकारण चिरडीस जाऊन आमच्या बंधूंनीं त्या पत्रें पाठविणारावर तासेरा झाडला आहे. हें आमच्यामतें अगदीं अप्रशस्त आहे. कारण प्लेगच्या धामधूमीच्या तडाख्यांत पुणेकरांस जो जुलूम झाला तो ही छापण्या करितां पुणेकरांनीं पाठविला असतां त्यास वाटण्याच्या अक्षता दिल्याबद्दल आमच्या बंधूंस नुकताच असा प्रश्चाताप झाला तसाच हीं पत्रें न छापल्यामुळें पुढें होणार नाहीं असें आज नक्की कोण सांगूं शकेल? गुन्हेगाराचा पत्ता लागून तो आमच्या एका जातीचा आहे हें ठरेपर्यंत कोणासच कांहीं ह्मणतां येणार नाहीं. तथापि वर्तमानपत्रकारांस अतिशय हलकेपणा आणणारे वर्तन 'टाइम्स' च्या हातून घडलें एवढें झाल्या वांचून आमच्यानें राहवत नाहीं.

न्या० सिं०

ईस्ट इंडिया रेल्वेच्या खाना जंक्शन स्टेशनावर दोघां कामांध गोऱ्या दाक्तरांनीं त्या रेल्वेनें प्रवास करीत असलेल्या तीन स्त्रियांवर जुलूम केल्याची हकीकत 'बर्दवान संजीवनी' नामक पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. ती अशी आहे कीं, गेल्या ६ व्या तारखेस वरील स्टेशनावर मरकीचा तपास करीत असतां ह्या तिघी स्त्रिया सुस्वरूप व त्यांबरोबर दुसरें कोणी नाहीं असें पाहून तपास करणाऱ्या अंमलदारांनीं त्यांस खालीं उतरविलें. ह्या तीन स्त्रियांत दोन बंगाली व एक जपानी स्त्री होती. व ह्या तिघीही कलकत्यास जात होत्या. खालीं उतरल्यानंतर मरकीच्या कायद्याप्रमाणें त्यांजवर शक ठेऊन स्टेशनाबाहेर असलेल्या दोन झोंपड्यांत त्यांस नेऊन ठेविलें. रात्र झाल्यानंतर जपानी स्त्रीस त्या खोलींत भीति वाटूं लागल्यामुळें ती आपल्या खोलींतून ज्यात ह्या दोघी बंगाली स्त्रिया होत्या त्या खोलींत गेली. थोड्या वेळानंतर तेथें दोघे युरोपियन आले व त्यांनीं त्या स्त्रियांस वश होण्याविषयीं प्रयत्न चालविले. पुष्कळ कींव काकळूत केली, लालूच दाखविली तरी कबूल होईनात, तेव्हां त्यास मारण्याची धमकी दाखवूं लागले. तेव्हां जपानी स्त्री कबूल झाली व तिला बगलेंत मारून एकानें रस्ता धरला. दुसरा उमेदवार त्या दोघीं बंगाली स्त्रीयांजवळ राहिला. त्यानें आपली इच्छा तृप्त करण्याकरितां त्या स्त्रियांची पुष्कळ विनवणी केली. त्यांस अनेक प्रकारच्या आशा दाखविल्या, परंतु त्या कांहीं केल्या कबूल होईनात. तेव्हां तो कामांध त्यांजवर बलात्कार करूं लागला. तो प्राणांतिक प्रकार पाहून स्वसंरक्षणाकरितां त्या स्त्रीयांनीं मोठ्यानें ओरड केली. ती ओरड ऐकतांच स्टेशनच्या पहाऱ्यावर वगैरे असलेले पोलीसचे लोक धांऊन आले. त्यांस पहातांच तो नराधम पळून गेला. पण त्या दोघांसही पकडले असून हावरा येथील पोलीस सुपरिंटेंडेंटकडे हा खटला गेला आहे. पुढें चवकशीअंती त्याचा परिणाम काय होतो तें पहाणें आहे, पण अशा गुन्हेगारांस जरा कडक शिक्षा केल्याशिवाय असले गुन्हे होणें बंद होणार नाहींत.

गोदावरी जिल्ह्यांतील यमागुदयिम तालुक्यांत धान्याची विशेष लूट होण्याची भीति असल्यानें तेथें बंदोबस्ता करितां पोलीस फौज वाढविण्याचा विचार चालला आहे. निजामच्या राज्यांतील दुष्काळपीडित लोक तिकडे गेले असून त्यांनीं ही लूट चालविली आहे व त्यांतील कित्येकांस पोलीसानें पकडलें आहे.

असें समजतें कीं, हैद्राबाद जिल्ह्यांतील दुष्काळपीडित दंडखोरांनीं कोयला गुडम जवळील इंग्रजी हद्दींतील गांवांतील लूट चालविली त्यामुळें गांवचे लोक दहा दिशांत पळूं लागले. बंदोबस्ता करितां पोलीसांस गोळीबार करावा लागला. त्यांत १ स्त्री मरण पावली व दोन मनुष्यें जखमी झालीं. पोलीस सुपरिंटेंडेंटनें पोलीस पार्टीसह तेथें जाऊन २६७ लोकांस पकडलें. त्यांपैकीं ६७ कैद करून बाकीचे जामिनावर सोडले. येथील बंदोबस्ता करितां ४० कान्स्टेबल व पायदळ पलटणीची १४० शिपायांची तुकडी पाठविली आहे.

नागपूर जवळील मोहगांव येथें आग लागून ९५ घरें जळालीं.

पेशीन व क्वेटा या प्रांताचे समोंवती टोळांनीं थोड्या दिवसांपूर्वीं पिकांचें बरेंच नुकसान केलें. तेच टोळ हल्लीं अफगाणीस्थानांत आले असून तेथेंही फळबाग व धान्य यांचीं उभीं पिकें उद्दस्त करीत आहेत.

हिमालय पर्वतावर बरींच तुफानें होत आहेत. सिमला व नैनिताल येथें वावटळीनें बरेंच गांजिलें आहे, या वरून पावसाळ्यांतील वारे पुन्हां सुरू होतील असें अनुमान करण्यांत आलें आहे.

मालवण तालुक्यांतील आलेल्या बातमी वरून असें समजतें कीं, तिकडे ह्या आठवड्यांत इतका भयंकर व तुफानी वारा सुटला होता कीं, त्या योगें हजारों झाडें मुळासुद्धां उपटून पडलीं, शेंकडों घरें कोसळलीं व विशेष ह्मणतात कीं, ह्या वाऱ्याच्या जोरानें कित्येक जनावरें आकाशांत उडून गेलीं होतीं.

तुर्कस्थानचे मुसलमानांनें आस्ट्रियाच्या बादशहास थेसली प्रांताबदल तुर्क लोकांचे विचारास आपण अनुमोदन द्यावें. अशी तार पाठविली होती. तारेच्या जबाबांत आस्ट्रियाचे बादशहानें मुसलमानास कळविलें कीं, स्वतःचे फायद्यासाठीं सुलतानानें निरनिराळ्या राष्ट्रांचे वकीलांचें ह्मणणें मान्य करावें.

क्रीटसंबंधीच्या मिळालेल्या ताज्या बातमीवरून असें समजतें कीं, केनेडिया येथें वाशीबाजुक लोकांबरोबर सामना झाला, त्यांत १६ इंग्रजी लष्करी मारले गेले. इंग्रजांच्या आरमारावरील ३०० मनुष्यांस केनेडियास उतरविलें आहे. व मुसलमानाकडून अधीक दंगा फिसाद न व्हावा ह्मणून वेगवेगळ्या राष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांकडून पांच पांच आरमारें पाठविण्यांत आलीं आहेत.

स. वि.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.